म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १८३५
१२३४
REFBK-0005007
REFBK-0005007

म. ग्र. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ९८३४

निबंध
९८३४

# अर्पणपत्रिका.

निबंध
९८३४ ११।६।६०

## रा. रा. न. चिं. उर्फ तात्यासाहेब केळकर

यांस

त्यांची राजकारणांतील सारासार विवेकदृष्टि, त्यांची समाजाशीं सौजन्यपूर्वक वागणूक, त्यांचें महाराष्ट्र वाङ्मयांतील श्रेष्ठत्व इत्यादि गुणांविषयीं निष्ठेचें द्योतक ह्मणून मी हें पुस्तक त्यांस अर्पण करीत आहे.

५००७

शंकर बापूजी मुजूमदार

REFBK-0005007

प्रकाशक व मुद्रकः—**प्रभाकर शंकर मुजूमदार,**
लक्ष्मी नारायण प्रिंटिंग प्रेस, १९९ कसबा, पुणें २.

निबंध २५।६।५०
१६३५

# प्रस्तावना.

आलीकडे ग्रंथ लिहिणाराच्या प्रस्तावनेला कांहीं शिफारशींचेही अभिप्राय जोडण्याचा प्रघात पडला आहे. परंतु 'कुलीन स्त्रिया आणि रंगभूमि" हा वादग्रस्त विषय आहे. याचसाठी प्रस्तावनेला दुसऱ्याच्या मताची पुरवणी न जोडतां स्वतःलाच काय वाटतें तें प्रस्तावनेंत सांगून टाकावें हें प्रशस्त दिसतें. या विषयाची चर्चा येथील ज्ञानसत्रांत महिनाभर चालली होती. ( ता. १८ सप्टेंबर १९३३ ते नोव्हेंबर ता. १७ पर्यंत) नाट्यविषयाच्या चर्चेला इतकी संधि मिळाल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे. या चर्चेत प्रो. माटे, एम. ए., प्रो. चाफे[illegible], एम. ए. एलेल. बी., रा. कृष्णराव मराठे, रा. धोंडो दामोदर [illegible]रेकर. रा. गो. म. जोशी, यांनीं भाग घेऊन कुलीन स्त्रियांनीं र[illegible]वर प्रवेश करण्याविरुद्ध सप्रमाण विवेचन केलें. प्रस्तुत लेखकानेंही दोन दिवस आपले बरे वाईट विचार तेथें मांडले. तेच विचार पुस्तकरूपानें प्रसिद्ध करून लोकांपुढें मांडावे असें वाटल्यावरून प्रसिद्ध होत आहेत. व्याख्यात्यांच्या विचार सरणीवरून आपली परंपरा व संस्कृति सोडण्याला समाज अद्याप तयार झाला नाहीं हेंच दिसून येतें. स्त्रिया बद्दलचा कळवळा दाखवून नवमत वाद्यांचा नव्या नव्या विचाराचा पगडा समाजावर बसविण्याचा हा प्रयत्न आहे असेंच ह्मणावें लागतें. स्त्रीवर्गाच्या बाबतींत समाजांत पुष्कळ प्रगति झाली आहे. परंतु प्रत्यक्ष स्त्रीवर्गाला रंगभूमि हा स्वावलंबनाचा मार्ग आहे असें वाटत नाहीं. त्या वर्गालाही आपल्या उन्नतीचे विचार सुचतात व वेळोवेळीं त्याच्याकडून प्रगट केलेही जातात. परंतु यांत रंगभूमीचा रस्ता कवटाळण्याचा कोणी उपयोग केला नाहीं.

कुलीन स्त्रिया आणि रंगभूमि या वादापासून, कुलीन कोणास म्हणावें, या प्रश्नावर कोणी उठाठेव करीत आहेत. जिचें वर्तन कुलीन स्त्रीप्रमाणें आहे

परंतु जी विवाहानें बद्ध झालेली नाहीं, तिला कुलीन ह्मणतां येईल का नाहीं, किंवा जी प्रथम वेश्या होती; परंतु उपरतीनें तिनें एखाद्या पुरुषाबरोबर लग्न केलें (तारुण्य गेल्यावर काय? "वृद्धा नारी पतिव्रता" ही म्हण या स्थित्यंतरावरूनच पडली असावी असें वाटतें.) तर ती कुलीन या पदवीस पात्र होईल कां नाहीं, अशा प्रकारचे प्रश्न आलीकडे वर्तमानपत्रांतून निघू लागले आहेत. परंतु खरा वाद ज्यांना आपण "कुलीन स्त्रिया" या जाणीवेनें पाहतों व समजतों, त्यांनीं रंगभूमीवर जावें का नाहीं? या बद्दलचा आहे. पूर्वीं कोणी तरी एखादी होती तिला कुलीन स्त्री म्हणून समजावें कां नाहीं हा प्रश्न नाहीं. कारण जिची आपल्याला कुळकथा माहीत नाहीं, तिला आपण सौभाग्यवति किंवा कुमारी म्हणत आहांतच व अशा पैकीं कांहीं आज रंगभूमि भूषित करीत आहेत. हल्लींचा प्रश्न "न भूतो" कधीं न ऐकलेला; कुलीन स्त्रियांनीं रंगभूमीवर जावें कां नाहीं हा आहे.

चांगले स्त्रीपार्टी उदयास येईपर्यंत दुसऱ्याच्या सुस्वरूप बायकांवर नाट्यकलेचें दारिद्र्य दूर करूं पाहण्याचा मार्ग कोणीं कोणीं सुचविला आहे. हा मार्ग म्हणजे, एकाला त्याचा अंगरखा 'अप्रा' (अपूरा) होत होता म्हणून दुसऱ्याच्या अंगांतला सैल अंगरखा काढून त्याला देणाऱ्या राजाप्रमाणेंच आहे म्हणावयाचा. गंधर्व मंडळीनें लाखो रुपये नाटकाच्या धंद्यावर कमाविलं; तिला गंधर्वाच्या जागीं एकादें स्त्रीपात्र मिळवितां येऊ नये काय? किर्लोस्कर मंडळीला गंधर्व काय परमेश्वरानें आणून दिला होता? गंधर्व हें पात्र प्रस्तुत लेखकाच्या प्रयत्नानेंच पात्र आहे. भाऊराव कोल्हटकर, विनायकराव बेहेरे हीं स्त्री पात्रें प्रयत्नानेंच किर्लोस्कर मंडळीला मिळवितां आलीं. स्त्रीपात्राच्या लायकीचीं चांगलीं पात्रें जगांत मिळूं शकणारच नाहींत? परंतु हल्लींच्या नाटक मंडळ्यांनीं किंवा प्रत्यक्ष गंधर्वांनीं अशी काय पुण्याई सांचवून ठेवली आहे कीं, पुढच्या पिढीनें नाट्यकलेच्या सेवेला आसक्तीनें पात्रें पुढें यावीं? पुरुष स्त्री पात्राच्या अभावीं किंवा नाट्य कलेच्या उन्नतीच्या सबबीवर कुलीन स्त्रियांवर नाट्यकलेची

घोरपड घालणें ही एक प्रकारची त्यांच्यावर आपत्ति आहे असें म्हणणें भाग येतें. ज्या स्त्रिया हौसेनें, आवडीनें किंवा उदार्निर्वाहाची सोय म्हणून नाटकांत जाणाऱ्या असतील त्या जातील. त्यांना कोणी समाजाच्या बाहेर टाकलें नाहीं व टाकीत नाहीं. परंतु कुलीन स्त्रियाकरितांच ज्यांचा आग्रह आहे त्यांचा वेळींच निषेध केला पाहिजे. स्त्री जातीच्या, सौजन्य, विनय, पावित्र्य इत्यादि गुणांची पायमल्ली करण्याकरितां कां त्यांना रंगभूमीचा मार्ग दाखवावयाचा? कुलीन स्त्रियांनीं रंगभूमीचा धंदा कां स्वीकारावयाचा तर त्यांच्या ठिकाणीं परमेश्वरानें सौंदर्यसंपदा दिली आहे म्हणून. ही सौदर्यसंपदा परमेश्वरानें त्यांना दिली हें त्या स्त्रियांचें पूर्व जन्मींचें पापच समजलें पाहिजे. व ज्या सौंदर्य विहीन कुलीन स्त्रिया असतील त्यांना कुरुप केल्याबद्दल त्यांनीं परमेश्वराचे आभार मानले पाहिजेत. परंतु हें समजलें पाहिजे कीं, स्त्रियांच्या सौंदर्यावर व तिच्या पातिव्रत्यावर त्यांच्या पतीचींच सत्ता असते व त्यांचे सद्गुण व रूतशील हे समाजानें वाखाणण्याकरितां आहेत. स्त्रियांच्या सौंदर्यावर अशा तऱ्हेने लोभी दृष्टि पुरुष ठेवूं लागले तर, मुसलमानांची गोषाची चाल व मराठे लोकांची मराठमोळ्याची चाल बरी म्हटली पाहिजे. नाट्यसृष्टींतलें अंतरंग निराळे व बाह्यरंग निराळे आहेत हे ज्यांना माहीत आहेत ते स्त्रियांना रंगभूमीवर आणण्याचें कधीं समर्थन करणार नाहींत; मग कोणी कसेंही समर्थन करोत.

व्यक्तीस्वातंत्र्याच्या तत्वावर कोणी कुलीन स्त्रियांच्या व्यक्तीस्वातंत्र्याचा मुद्दा पुढें करतात. हल्लींच व्यक्तीस्वातंत्र्याच्या तत्वावर पुष्कळ संसारांत असमाधान वावरत आहे. पितापुत्रांत एक विचाराचें वातावरण दिसेनासें झालें आहे. त्यांतच पतिपत्नीच्या एकोप्यांत व्यक्तीस्वातंत्र्याच्या तत्वावर पत्नी जर रंगभूमीचा पेषा पतकरील तर त्यामुळें त्यांच्या संसारांतलें वातावरण असंतोषाच्या व असमाधानाच्या ढगानें अंधुक होईल. मध्यस्थितींतला संसार गरिबींत असो अगर हरिबींत असो मोठ्या एकोप्यानें व सुखासमाधानानें

चाललेला आपण पाहत आलों आहोंत, त्याच संसारांतील स्त्रियांवर रंगभूमीच्या पुरस्कर्त्यांची धाड असणार. कारण एखाद्या गर्भश्रीमंत, जाहागीरदार इत्यादि थोर घराण्यांतील स्त्रियांवर यांची दृष्टि पोचणें अशक्य आहे. तेंव्हां अशा गरिबींतल्या संसारांतल्या स्त्रियांना रंगभूमीचा मार्ग दाखविण्याचा प्रयत्न करणें हा त्यांचा संसाराचा बिघाड करणें आहे.

० आज ८०-९० वर्षें नाटकाचा धंदा अस्तित्वांत आहे. शेकडों नट या धंद्यांत आले व गेले. कित्येकांनीं या धंद्यांतल्या दुर्गुणाचा वारा स्वतःला लागू दिला नाहीं. कित्येकांनीं धंद्याला उर्जित अवस्था यावी म्हणून प्रयत्न केले; परंतु अद्यापि या धंद्यावर त्याच्या वाईट परिणामावरून लोकांचे आक्षेप आहेत ते कायम आहेत. असें असून याच धंद्यांत कुलीन स्त्रियांना प्रवेश करण्याचा उपदेश करणारांना काय म्हणावें हेंच समजत नाहीं. जो परिणाम पुरुषाच्या बाबतींत इतक्या कालावधीनें दिसत आहे, तोच स्त्रियांच्या बाबतींत दिसणार नाहीं असें खात्रीनें कोणी सांगू शकेल काय? प्रथम या धंद्यावर जे आक्षेप आहेत ते नाहींतसे करा आणि नंतर स्त्रियांना त्यांत लोटा.

रा. सा. वसंतराव देसाई बी. ए. एल एल. बी यांनीं ज्ञानप्रकाशांत नुकतेच पांच लेख प्रसिद्ध केले आहेत. त्यांचा प्रस्तुत विषयांत उल्लेख करणें जरूर आहे. पहिल्या चार लेखाचें व रा. टेंबे यांच्या लेखाचें धोरण जवळ जवळ एकच आहे म्हटलें तरी चालेल. देसायांच्या प्रत्येक मुद्याचें खंडण करणें अवश्य आहे असें वाटत नाहीं. कारण, संरक्षक बंधनें या प्रकरणांत जे विचार त्यांनीं प्रदर्शित केले आहेत, त्यांची त्यांना अवश्यकता वाटली यावरूनच ते आपल्या मुद्याविषयीं साशंक असावेत असें दिसतें. ते म्हणतात कीं "समाजांत किती जरी वाद माजला तरी स्त्रिया रंगभूमीवर जाणार हें नक्की झालें आहे." परंतु ही गोष्ट ते नवीन सांगत नाहींत. नाटकाचा धंदा वाईट म्हटला जात असून त्यांत हजारो आले व गेले; तसें स्त्रियाही रंगभूमीवर येतील व जातील. परंतु त्यांच्या मुळें धंद्याची उन्नति होईल असें खात्रीनें त्यांना सांगतां आलें नाहीं.

दुसरा एक मुद्दा यांनीं काढला आहे. " कुलीन स्त्रिया ह्मणजे परंपरागत लग्न संबंधाचीं अपत्यें नव्हेत. कुलीन आईबापाच्या पोटीं जन्मास येऊन शील-वंत असलेली स्त्री किंवा हीन जन्म लाभूनही स्वतःच्या चारित्र्याच्या जोरावर एका नवीन कुलीन घराण्याला जन्म देऊं इच्छिणारी स्त्री ह्मणजे कुलीन स्त्री; अशा कुलीन स्त्रीच्या हिताची काळजी समाजानें वाहिली पाहिजे. हें कलम देसाई यांनीं कोणातरी व्यक्ति विषयक कुलीन स्त्रियांच्या सदरांत येणाऱ्या रंग-भूमीवर असणाऱ्या स्त्री विषयीं उद्देशून घातलें असावें असें उघड दिसतें. "मला कुंकू लावा आणि सुवासीन ह्मणा " अशी एक जुनी ह्मण आपल्यांत आहेच. परंतु शुद्ध आचरणाच्या स्त्रीला कुलीन ह्मटलें काय आणि न ह्मटलें काय तिची योग्यता कांहीं कमी होत नाहीं. तथापि या त्यांच्या मताला आम्ही विरोध करीत नाहीं. हेंच मत आम्ही पृष्ठ ७७ कलम ६ यांत उद्धारलें आहे. नट वर्ग शीलवंत असावा तसाच स्त्रीवर्गही शीलवंत पाहिजे. संसारांत शिलाच्या संयमाची अवश्य-कता आहे तसी नाट्य कलेंतही आहे. कुलीन स्त्रियांनीं हा धंदा करू नये, याचीं कारणें प्रस्तुत पुस्तकांत व परिशिष्टांतील लेखांत विस्तृत आलीं आहेत. तीं उपेक्षणीय नाहींत अशी आमची खात्री आहे.

प्रस्तुत पुस्तक बाहेर पडण्याचा संधीला वसंतरावाचा लेख प्रसिद्ध झाला ही गोष्ट युक्तच झाली असें ह्मटलें पाहिजे. त्यामुळें त्यांच्या लेखांचा परामर्ष घेतां आला. त्यानीं शेवटीं " संरक्षक बंधनांत " जीं आठ कलमें दिलीं आहेत, त्यांच्या आधारावरच आम्ही असें भाकीत करतों कीं, कुलीन स्त्रियांचा रंग-भूमीवर जाण्याचा पायंडा सहसा यशस्वी होणार नाहीं. राजकारणांत हल्लीं जाती निर्णयाचा प्रश्न पुढें आला आहे. तितकाच महत्वाचा किंबहुना अधिक, कुलीन स्त्रियांनीं रंगभूमीचा धंदा पतकरावा कीं नाहीं, हा प्रश्न समाजापुढें विचारा करितां आला आहे. पूर्वीं एखादा जुन्या पक्षाच्या समाजाला अगदीं नवा व अपरिचित असा प्रश्न उपस्थित झाला ह्मणजे तो उपस्थित करणाराला " सुधारक" म्हणून ह्मटलें जात असे, परंतु त्या वर्गांत सुद्धां संस्कृतीच्या दृष्टीनें

कुलीन स्त्रियांनीं हा धंदा (नाटकाचा) करणें योग्य नाहीं असें म्हणणारे पुष्कळ आहेत. तेव्हां ज्यांनीं हा प्रश्न उपस्थित केला आहे, ते एक प्रकारचे नवमत वादी समजले पाहिजेत. त्यांचीं मतें समाजविशिष्ट नसून व्यक्तिविशिष्ट आहेत. त्यांच्या ग्राह्याग्राह्यतेचा विचार सामाजिक विचारानें केला पाहिजे.

आपल्या आर्य स्त्रियांची योग्यता किती आहे इचें वर्णन अहिताग्नी राजवाडे यानीं पुढील सुभाषितांत याच विषयाचा समारोप करतांना केलें होतें; तें आपल्या स्त्री पुरुष वर्गानें सतत ध्यानांत ठेवण्यासारिखें आहे. तें सुभाषित हें:—

**तल्पे प्रभुरिव गुरुरिव मनुसिज शास्त्रे श्रमे भुजिष्येव।**
**गेहे श्रीरिव गुरुजन पुरतो मूर्तेव सा व्रीडा॥**
**संचारो रति मंदिरावधि, सखी कर्णावधि व्याहृतम्।**
**चेतः कान्त समिहितावधि, महा मानोपि मौनावधि॥**
**हास्यं चाधरपल्लवावधि पदन्यासावधि प्रेक्षितम्।**
**सर्वंसावधिः नावधिः कुलभुवाम् प्रेम्णः परम् केवलम्॥**

[शय्येच्या ठिकाणीं धन्याप्रमाणें, कामशास्त्रांत गुरुप्रमाणें, श्रमपरिहारार्थ दासीप्रमाणें, घरांत लक्ष्मी, वडील माणसांपुढें मूर्तिमति लज्जेप्रमाणें हा पत्निधर्म आहे. स्वतःच्या शयन गृहापर्यंत संचार; मैत्रिणीच्या कर्णापर्यंत संभाषण (गुजगोष्टी) पतीच्या इच्छेला मान्यता, मौनवृतांत मानीपणा, हास्य ओठापर्यंत, दृष्टि पावला पर्यंत या प्रमाणें कुलीन स्त्रियांचे सर्व कांहीं मर्यादशील आहे, फक्त त्यांच्या प्रेमाला अंत नाहीं.]

स्त्री जातीच्या अशा या अनुपम गुणांची पायमल्ली त्यांच्या रंगभूमीवरच्या व्यासंगानें झाल्याशिवाय राहील का याचा विचार ज्याचा त्यानें करावा.

हा विषय चर्चेकरितां पुढें आणावा अशी रा. रा. कृष्णराव मराठे यांची फार इच्छा होती; व त्यांच्याच खटपटीनें ज्ञानसत्रांत महिनाभर चर्चा चालली

होती. वाङ्मयांतील अश्लीलता मार्मिकरीतीनें शोधून काढून ती चव्हाट्यावर आणणें हा त्यांचा व्यासंगच झाला आहे. प्रस्तुत पुस्तक बाहेर येण्याला तरी त्यांचेच प्रयत्न कारण आहेत. प्रोफेसर मोटे, आचार्य देशपांडे, व आर्टिस्ट गोडबोले यांचे लेख (भाषण) त्यांनींच मिळवून दिले आहेत. या गोष्टींचा उल्लेख आभारपूर्वक येथें करणें अवश्य आहे.

१९९ कसबा पेठ,
पुणें शहर.
आक्टोबर १११९३४.

शंकर बापूजी मुजूमदार.

---

## — ❀ अवश्य वाचा ❀ —

**रंगभूमि मासिकपुस्तकांतून प्रसिद्ध झालेले नाट्यविषय पुस्तकरूपानें स्वतंत्र घेण्यास सुलभ पडावे ह्मणून स्वल्प किमतींत वेग वेगळे विक्रीस काढले आहेत. महाराष्ट्र भाषेत नाट्य वाङ्मयाची इतकी विस्तृत माहिती व विवेचन इतर ठिकाणीं दुर्मिळ आहे. पुस्तकाच्या किमतीसह यादी सोबत आहे.**

या पुस्तकासोबत १९१५ सालीं नाटकांत स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनींच कराव्यात काय या विषयावर मागविलेले अभिप्राय पुस्तकरुपानें स्वतंत्र दिले आहेत. पौराणिक नाटकाच्या वेळेच्या कांहीं प्रसिद्ध स्त्रियांचीही सचित्र माहिती यांत दिली आहे.

पाश्चात्य नाट्यकलेंतील रंगभूमीवरील चुंबनाचे निरनिराळे प्रकार सदरील पुस्तकांत सोबत मिळतील, किंमत ८२.

---

# अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| अर्पणपत्रिका | |
| प्रस्तावना | १ |
| उपोद्घात | १ |
| कलाविकास | २ |
| कलाविकासाकरितां स्त्रिया पाहिजेत | ७ |
| कुलीन स्त्रियांच्या अडचणी | १५ |
| कलेचा विकास नसून विचका आहे | १७ |
| पाश्चात्य रंगभूमीवरील स्त्रिया | १९ |
| सुशिक्षित भगिनीवर्ग काय म्हणतो | २५ |
| यद्यपि शुद्धम् लोक विरुद्धम | २९ |
| नटवर्यांचें स्वभाववर्णन | ३० |
| लोकमत तयार झालें नाहीं | ३२ |
| नाट्यकलेचा ऱ्हास का झाला | ३४ |

## परिशिष्टें

| | |
|---|---|
| १ आयुर्वेदाचार्य पांडुरंग हरि देशपांडे | ३७ |
| २ प्रो. श्री. म. माटे. | ४५ |
| ३ रघुनाथ दत्तात्रय गोडबोले आर्टिस्ट | ५० |

# कुलीन स्त्रिया आणि रंगभूमि.

१८५ ता. १. ५. १९४० ता. ११. ४८ ३००० दा. क्र.

## उपोद्घात.

या विषयाची चर्चा अलीकडे दोन तीन वर्षांत प्रसिद्धपणें होऊं लागली आहे. गेल्या शारदीय ज्ञानसत्रांत अहिताग्नि राजवाडे यानीं नाट्य विषयक वाङ्मयाला अग्रस्थान दिलें होतें. " १ महाराष्ट्रांतील रंगभूमि आणि तीवरील नट, नाट्य आणि नाटकें; २ नाटकें कशीं असावीं ? नीति राखून कला वाढविणारीं कां कलेकरितां नीति सोडणारीं ? ३ कुलीन स्त्रिया आणि रंगभूमि; व ४ अधुनिक चित्रपट–हलते आणि बोलते–यांपासून नीतीच्या आणि कलेच्या दृष्टीनें समाजावर होणारे इष्टानिष्ट परिणाम. "

हे नाट्य विषय चर्चेकरितां होते. आजपर्यंत अशा विषयाचें सभेमध्यें विवेचन करण्याला कोठेंच वाव नव्हती. ती अहिताग्नि राजवाडे यांनीं करून देऊन नाट्य कलेचें महत्व चव्हाट्यावर आणलें. याबद्दल त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. त्यांत "कुलीन स्त्रिया आणि रंगभूमि" या विषयानें लोकांची जिज्ञासा अधिक जागृत झाली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. पाश्चात्य अनुकरणाच्या दृष्टीनें ज्या गोष्टी आपल्या समाजांत शिरल्या आहेत, किंवा शिरू पहात आहेत, त्यांतीलच कुलीन स्त्रियांना रंगभूमीवर आणून सोडण्याचाही कांहीं लोकांचा प्रयत्न आहे. हा कितपत सिद्धीस जाण्यासारखा आहे, हे गत इतिहासाच्या व भावी कालाच्या अनुभवानें ठरवावयाचें आहे.

## कलाविकास

जे कुलीन स्त्रियांनीं रंगभूमीचा पेषा पत्करावा म्हणून म्हणतात, त्यांचें मुख्य प्रतिपादन "कलाविकासा"ला व "नाट्य कलेच्या उन्नतीला" धरून आहे. याशिवाय या विषयाला पोषक असे त्यांचे आणखी मुद्दे आहेत ते म्हणजे:—

१ पुरुषांपेक्षां स्त्रियांकडून स्त्री भूमिका चांगल्या होतील.

२ कलेची उन्नति स्त्रियांकडूनच होईल.

३ नीतिदृष्ट्या नाटकाच्या उन्नतीला कमीपणा येणार नाहीं.

या विरुद्ध असणाराचे मुद्दे:—

१ नीतिदृष्ट्या स्त्रियांनीं रंगभूमीचा पेषा पत्करणें निंद्य आहे.

२ कलेच्या दृष्टीनें स्त्रियांना रंगभूमीवर आणणें आवश्यक नाहीं.

३ हल्लीं नाट्यकलेचा जो ऱ्हास होत आहे तो स्त्रियांना रंगभूमीवर आणल्यानें टळेल असें वाटत नाहीं.

या प्रमाणें परस्पर विरुद्ध अशीं या वादविषयावर मतें आहेत.

या विषयाचा इतिहास पाहूं गेलें तर महाराष्ट्र रंगभूमीवर स्त्रिया आज सुमारें साठ वर्षें काम करीत आल्या आहेत, त्या पासून नाट्यकलेंत विशेष कांहीं सुधारणा झाली नाहीं. किंवा तिची अवनतीही झाली नाहीं. या स्त्रियांत कांहीं सौंदर्यानें व अभिनयादि गुणांनीं चांगल्या पैकींही होऊन गेल्या आहेत. परंतु नाट्यकलेच्या उन्नतीला पोषक असें कांहीं कार्य त्यांचे हातून झालें नाहीं. त्या कुलीन वर्गापैकीं नव्हत्या म्हणून त्यांच्याकडून तें कार्य झालें नाहीं, असें " स्त्रिया व रंगभूमि " या विषयाचें प्रतिपादन करणारांचें

म्हणणें आहे. मनुष्य एखाद्या विषयाचें प्रतिपादन आपल्या मतानें करूं लागला म्हणजे त्याच्या समजुतीनें आपलें प्रतिपादन अगदीं निरुत्तर आहे, असें घेऊन तो तें करीत असतो.

रा. टेंबे यानीं " रंगभूमि आणि स्त्रिया " याविषयाचें आपलें प्रतिपादन रत्नाकर मासिकांतून विस्तृतपणें केलें आहे. परंतु त्यांत अनेक अवांतर व अवास्तव विषय आणून त्यानीं आपल्या प्रतिपादनाचें फारच अवडंबर माजविलें आहे. त्यांचें समर्थन काय तें, नाट्य कलेची उन्नति व्हावयाची असेल तर ती स्त्रीभूमिका स्त्रियांनीं केल्यानेंच होणार आहे. त्यांच्या दृष्टीनें हाच एक राजमार्ग नाट्यकला सुधारण्याचा आहे, या विषयाचें रा. टेंबे यांचें निरूपण वाचून दुसरी तिसरी टेंब्यांच्या बौद्धिक कल्पकते विषयीं कोणतीही कल्पना मनांत येत नसून त्यांच्यांत शृंगार विषयक कल्पना ओतप्रोत भरल्या आहेत हें निदर्शनास येतें. या विधानाची सत्यता पाहणें असेल तर वाचकांनीं रत्नाकर मासिकाचा वर्ष ३ रें अंक ७ वा [सन १९२८चा] पाहावा. कीर्तनांत जसा प्रथम पूर्वरंग व नंतर आख्यान लावण्याची हरदासांची चाल आहे. त्याप्रमाणें "रंगभूमि आणि स्त्रिया" या विषयाचा पूर्वरंग रा. टेंबे यानीं सदर अंकांत भरला आहे. स्त्रियांच्या ठिकाणीं जें काय " कंठमाधुर्य, स्त्री जातीची शारीरिक व मानसिक घडण, नृत्याला योग्य असा अवयवांचा लवचिकपणा व गोंडसपणा, नाट्याला योग्य अशी अनुकरणवृत्ति हे सर्वगुण विधात्यानें स्त्रीनें नाट्यकलेकडेच खर्च करण्याकरितां ठेवले आहेत." हें नाट्य कलेला पोषक असें स्त्रियांच्या गुणांचें वर्णन वाचून प्रसिद्ध बाणभट्ट याच्याही

कादंबरींतील स्त्री जातीविषयक सौंदर्याचें वर्णन फिकें वाटेल! रा. टेंबे स्वतःच्या निरीक्षण दृष्टीनें म्हणतात कीं, "रस्त्यांतून जातां जातां एखाद्या बालिकेच्या किंवा तरुणीच्या चालण्याकडे लक्ष दिलें, तरी त्यांतील डौल व लालित्य (?) चट्कन दिसून येतात. कलेच्या दृष्टीनें वास्तविक स्त्रियाच तेवढ्या चालतात. पुरुष हा प्राणी निव्वळ रस्ता तुडवितो असें म्हणावें लागेल. स्त्रियांचें पदलालित्य-नाटकाच्या चालींतील पदलालित्याप्रमाणेंच मनोहर असतें." रा. टेंबे यानीं एखाद्या नाटकांतील पदलालित्य आणि स्त्रियांच्या चालण्यातील पद-लालित्य यांचें साम्य स्पष्ट दाखविलें असतें तर बरें झालें असतें. स्त्रियांच्या अंगच्या विधात्यानें दिलेल्या या वर्णनावरून रेनॉल्डच्या "सोल्जर्स वाईफ" नांवाच्या करुण रसभरित कादंबरींतील एका प्रसं-गाच्या वर्णनाचें चित्र दृष्टीपुढें उभें राहतें व विषयांतराचा दोष पत्करून तो प्रसंग येथें देणें अवश्य वाटतें. एका खेडेगांवांतल्या दारूच्या गुत्त्यावर मंडळी जमली असतां, एक लष्करी अधिकारी (सार्जंट) सैन्यांत भरतीचीं माणसें गोळा करण्याकरितां तेथें आला होता. ह्या ठिकाणीं लोकांचें मन वळविण्याकरितां सैन्यांतल्या शिपायांच्या ऐषआरामाचें व चैनीचें वर्णन करीत असतां तो म्हणतो:—

"Why it is the most beautiful state of existence that can possibly be conceived. Here you have your great lords and wealthy gentlemen paying large sums of money out of their own pockets to travel on the continent and

see the fine things there; but soldier travels to the most distant parts of earth at no expense of his own. His sovereign pays for him. ......I tell you gentlemen I am blowed up with pride, when I think that for thirty years of my life, for I entered the service young, gentlemen as a drummer. I have seen all parts of the world at the expense of my King and my country. Is not the soldier adored by fair sex ? don't women's smile and their bright eyes beam upon him ? Why gentlemen there is never a female heart that does not go a pit a pat at the sight of a uniform......well then as I was saying the soldier travels for nothing and his loves cost him nothing."

सार्जंटच्या या रसभरित वर्णनानें एक सावज कसें बळी पडलें हीं दुःख पर्यवसायी कादंबरी पुष्कळांच्या वाचण्यांत आली असेल. रा. टेंब्यांनीं कलाविकासाची थोरवी आपल्या लेखांत अतिशयोक्तीनें वर्णन केली आहे, ती वरील सार्जंटच्या अतिशयोक्तीच्या वर्णनापेक्षां कमी प्रतीची नाहीं. " नाट्योपयोगी साधन संपदा विधात्यानें स्त्री जातीच्या स्वाधीन केली आहे तिचा विनियोग " परमेश्वररूपी पतीच्या उपयोगासाठीं न करतां क्रयविक्रयाच्या रूपानें बाजारांत मांडून स्त्रीजातीनें करावा असा रा. टेंब्यांच्या प्रतिपादनाचा ध्वन्यर्थ निघतो, असें कोणी म्हणेल तर तें चुकीचें होईल असें वाटत नाहीं. स्त्री वर्गाच्या नाट्योपयोगी साधन संपदेचा उपयोग संधि मिळतांच

रा. टेंब्यानीं आपल्या माया मच्छिंद्र चित्रपटांत कसा भरपूर करून आपल्या कला विकासाची हौस पूर्ण करून घेतली आहे, हें त्यानीं मच्छिंद्रास झोपाळ्यावर बसवून नृत्यांगनांकडून रंगाच्या पिचकाऱ्यांचा रंग त्याच्या अंगावर उडविला आहे. यांत सांगण्याची गोष्ट ही कीं, यांतील मच्छिंद्राची भूमिका रा. टेंबे यांचेकडे आहे. मागें ह्मटल्याप्रमाणें रा. टेंबे यांची स्त्री जाती विषयक कल्पना शृंगारोपयोगी कशी आहे, हें रंगाच्या पिचकाऱ्याच्या देखाव्यावरून दिसून येतें.

आमच्या स्त्री जाती विषयींची उच्च वर्णातील भावना स्त्रिया या गृहलक्ष्मी आहेत अशी आहे. तरी या भावनेचा विपर्यास करून आमचा समाज स्त्री जातीला उपभोग्य वस्तु समजतो, असेंही ह्मणणारे कांहीं आहेत; परंतु रा. टेंबे यांचें स्त्री जाती संबंधीं नाट्योपयोगी वर्णन स्त्रियांचा गोंडसपणा, त्यांचें कंठमाधुर्य, त्यांच्या (चरण) चालीचें पदलालित्य, त्यांचें बाहुलीचें कोडकौतुक करणें व तिला स्तनपान करविणें इत्यादि अनुकरण वृत्तींचें विवेचन वाचून कोणाचीही खात्री पटेल कीं, स्त्रिया या उपभोग्य वस्तु आहेत, असें टेंबे घेऊन चालले आहेत. रा. टेंबे यांच्या प्रत्येक विधानाचें खंडण करावयाचें ह्मणजे, त्यानीं जितकीं पानें खर्ची घातलीं आहेत, तितकीं किंबहुना जास्ती खर्ची घालावीं लागतील. आह्मी आरंभींच ह्मटलें आहे कीं, टेंबे यांच्या विवेचनांत अनेक अवांतर विषय असून, त्यांचें प्रतिपादन विषय सोडून झालें आहे. त्यांनीं या विषयाच्या लेखाला आरंभ केला, त्या काळांत नाटकांत वहिवाटलेल्या वेश्यावर्गांतल्या स्त्रिया शिवाय कोणी नव्हत्या. सिनेमांत कांहीं होत्या त्या

नेहमीच्या गाण्यानाचण्यांतल्या व्यवसायांतल्या होत्या. तेव्हा टेंबे यांच्या उहापोहाचा परिणाम ह्मणून, नाटकांत आलेली कुलीन स्त्री त्या वेळेस एकही दिसत नव्हती. आलीकडे दोन वर्षांत मात्र "नाट्य मन्वंतरांत" कांहीं स्त्रिया कुलीन ह्मणून कामें करूं लागल्या आहेत. पैकीं एकीचा आरंभ सिनेमासृष्टींतला असून ती आतां नाट्यसृष्टींत आहे. यांचा पेषा वर्ष दीड वर्षाचा आहे. नाट्य सृष्टींतला त्यांचा अनुभव प्रत्यक्ष त्यांना कळून येण्यास आणखी कांहीं काळ लागेल. ह्मणजे त्या कलेच्या उपासक ह्मणून, अथवा आपल्या पतीशीं सहकारित्वाच्या भावनेनें ह्मणून, अथवा कलेची हौस ह्मणून, अथवा आर्थिक दृष्टीनें या धंद्यांत शिरल्या आहेत हें समजेल!

## कलाविकासाकरितां स्त्रिया पाहिजेत.

रंगभूमीवर स्त्रिया आणण्याचें मुख्य कारण असें सांगण्यांत येतें कीं, स्त्रियांचे सौंदर्यादि पूर्वोक्त गुण फक्त त्यांनीं नाटकांत दाखविण्याच्या उपयोगाचे आहेत. यावरून स्त्रियांचें सौजन्य, त्यांचा मर्यादशील स्वभाव, त्यांचा लाजाळूपणा, त्यांचें स्मित, त्यांचें मित भाषण, त्यांचें मौन हे नैसर्गिक स्त्रिजातीला भूषणभूत समजले जाणारे गुण, त्या जर नाटकांत नाचल्या नाहींत तर कवडीमोल आहेत असें म्हणावयाचें काय? घटकाभर असें घेऊन चालूं कीं, कला विकासाकरितां स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनींच करणें अवश्य आहे; परंतु प्रश्न असा येतो कीं, जेवढ्या म्हणून स्त्रिया रंगभूमीवर येतील, तेवढ्या सर्व नाट्यकला पूर्णत्वाला पोचविण्याला समर्थ

होतील काय ? समजा एखादी नटी अगदीं **एलन टेरी*** प्रमाणें महाराष्ट्र रंगभूमीवर चमकली, म्हणजे तिच्या एकटीच्यानें नाट्य कलेंतील व्यंगें नाहींतशीं होतील काय ? एकादा कलावंत एकाद्या कलेंत निष्णात झाला असला म्हणजे ती कला त्याच्यामुळें पूर्णत्वाला पोंचली असें होत नाहीं. फार तर एवढें म्हणतां येईल कीं अमूक कलेंत तो किंवा ती प्रसिद्ध आहे.

जमखिंडी संस्थानचे न्यायाधीश रा. रा. महाबळ यानीं रत्नाकर मासिकांत ( वर्ष ४ अंक १२–१९२९ ) या विषयावर निरुत्तर करण्यासारखे भारदस्त विचार प्रदर्शित केले आहेत. ते रा. टेंबे यांच्या लेखांचें खंडन करण्याच्या हेतूनेंच केले आहेत. ( पान ४२ पहा. ) रा. टेंबे यानीं आपले विचार या विषयाचें समर्थन करण्याच्या उद्देशानें मोठ्या चतुराईनें मांडले आहेत, हें कबूल केलें पाहिजे. परंतु हें समर्थन एखादा वकील आपल्या गुन्हेगाराची बाजू लंगडी आहे असें जाणत असतांना त्याच्या बचावाकरितां प्रयत्न करतो त्याप्रमाणें झालें आहे. “**नाटकमंडळ्यांची सांप्रतची स्थिति ही स्त्रियांनीं रंगभूमीवर येण्यास सर्वांशीं प्रतिकुल आहे.**” या रा. महाबळ यांच्या मताप्रमाणेंच रा. टेंबे यांचेंही मत “ **प्रचलित नाटक मंडळ्यांत स्त्रियांनीं प्रवेश करण्यापासून**

* ही नटी इंग्लंडांत फार प्रसिद्ध होऊन गेली. आयर्व्हिंग नांवाच्या नटाबरोबर ही काम करीत असे. हिचीं तीन लग्नं झालीं होतीं. रंगभूमीवर अनेक भूमिका करून इनें प्रसिद्धि मिळविली, तसें संसारांतही तिला अनेक पतित्व करावें लागलें म्हणावयाचें.

कांहींच इष्टसिद्धि होणार नाहीं. " असेंच आहे. असें असतांना हा विषय हातीं घेण्यापूर्वीं " आधीं कळस मग पाया " या म्हणी प्रमाणें नाटक मंडळ्याची स्थिति सुधारण्याचा उहापोह न करतां स्त्रिया आणि रंगभूमि हा वादग्रस्त प्रश्न त्यांनीं पुढें आणला आहे. आमच्या मतें तर सद्यस्थितींतील नाटक मंडळ्यांची सुधारणा होऊन स्त्रियांनीं रंगभूमींवर प्रवेश करण्याचा काळ व पुणें म्युनिसिपालिटीची पुणें शहराची पन्नास वर्षांनंतर सुंदरस्वरूप दिसण्याची योजना पाहण्याचा काळ--तोंपर्यंत नाट्यकला जगली तर—जवळ जवळ एकाच वेळेला येईल !

कांहीं काळ असा होता कीं, " शास्त्राद्रुढिर्बलीयसी " या वाक्याला प्राधान्य देऊन समाज चालत असे; परंतु अलीकडे रुढीला लाथाडून व्यक्ति स्वातंत्र्याच्या तत्वावर " मनः पूतं समाचरेत् " असें वर्तन होत चाललेलें दिसत आहे. मिश्रविवाह, सवल्लभ पलायन, ( elopement ) मिशा मुंडन हे सर्व प्रकार व्यक्ती स्वातंत्र्याच्या जोरावरच चालले आहेत कीं नाहींत ? हे सर्व पाश्चात्य शिक्षणाचें, त्या समाजाच्या चालीरीतीच्या संसर्गाचे, अभ्यासाचे किंवा आपल्या समाजांतील करारीपणाच्या दुर्बलतेचे परिणाम म्हणावे किंवा यदृच्छया या गोष्टी घडून येत आहेत म्हणून पाहिजे तर म्हणावे. या स्थित्यंतराच्या जोरावरच रंगभूमीवर कुलीन स्त्रियांना पाहण्याची उत्कंठा ज्यांच्या मनांत उत्पन्न झाली आहे, ते नाना प्रकारचीं आमिषें पुढें करून आपले उद्देश प्रतिपादीत आहेत. त्यांचा मोठा आक्षेप रुढीवर असतो. रुढी ह्मणजे

जणूं कांहीं एक मोठा राक्षस, किंवा प्लेगची सांथ आहे व समाजाची अवनति होण्याला या दोन्हीं पैकी एक कारण आहे, अशी त्यांची ओरड आहे. रुढी व्याख्यानांनीं किंवा सभा भरवून पडत नसते व कोणतीही पडली नाहीं. समाजांतील इष्ट अनिष्ट परिणाम पाहून रुढी पडत असतात; व मोडावयाच्या झाल्या तर प्रयत्न न करतांही मोडतात. पुनर्विवाहाची रुढी उच्च वर्णीयांत शास्त्रांनीं घातलेली नव्हती; परंतु प्रयत्नांनीं ती आतां मोडत आली आहे. त्याबद्दल पुणें शहरांतील मोठा वाद प्रसिद्ध आहे. परंतु त्या वेळीं एकंदर समाजाचें पाठबळ पुनर्विवाहाचा प्रघात पाडण्याला मिळालें नाहीं; व आतां राजरोसरीतीनें पुनर्विवाह-जरी सर्वांशीं नाहीं-तरी होत आहेत. त्याप्रमाणेंच कुलीन स्त्रियांचें रंगभूमीवर पाऊल आज जरी पूर्ण पडलें नाहीं तरी कालांतरानें पडणार नाहीं असें कोणी म्हणावें ? सद्यःस्थितीला जसे स्त्रियांना रंगभूमीवर प्रवेश करण्याला पाठिंबा देणारे कांहीं आहेत. तसाच त्याविरुद्ध पूर्व संस्कृतीचा संस्कार असलेला स्त्रीपुरुष वर्ग बहुमतानें निषेध करण्याइतका जागृतही आहे. कोणी कोणी जुने दाखले नाट्यशास्त्रांत असें आहे, पुराणांत तसें आहे, संस्कृत नाटकांत स्त्रिया रंगभूमीवर काम करीत होत्या—इत्यादि इत्यादि अनुमानिक पुरावे पुढें करतात. परंतु इतिहासाच्या पुराव्याच्या अभावीं या अनुमानाचा काय उपयोग ? शाकुंतल व मालविकाग्निमित्र नाटकांत स्त्रियांच्या भूमिका स्त्रिया करीत असत, हा पुसट पुसट पुरावा कांहींनीं प्रतिपादन केल्याचें वाचण्यांत येतें, त्याच शाकुंतल नाटकांत स्त्रीपुरुष स्वभावाचें

चित्र कालिदासानें किती यथार्थ वठविलें आहे तें लक्षांत घेण्यासारखें आहे. रा. महाबळ यानीं आपल्या लेखांत ह्मटलें आहे त्याप्रमाणें " मानवी मन अत्यंत दुर्बल असून कामक्रोधादि मनोविकारांच्या झपाट्यांतून पार पडणें त्यास अतिशय कठिण आहे. काम हा विकारच असा प्रभावी आहे कीं, त्याचा पगडा मनावर बसला, ह्मणजे लाजलज्जा, लौकिकाची चाड वगैरे प्रतिबंधक चटसाऱ्या गोष्टी लोपून जातात. **सामान्य संसारी मनुष्याच्या दृष्टीनें या विषयाकडे पाहिलें पाहिजे.** " शकुंतलेनें दुष्यंतास पूर्वी कधीं पाहिलें नव्हतें; परंतु प्रथमदर्शनीं त्याला पाहिल्याबरोबर " तपोवनांत न होणारे विकार माझ्या मनांत कां बरें उत्पन्न होऊं लागले " असें तिला वाटूं लागलें. शाकुंतल नाटकांतलि या प्रसंगाचें येथें उदाहरण देण्याचें कारण इतकेंच कीं, टेंबे म्हणतात, हजारों प्रेक्षकांसमोर रंगभूमीवर असतांना, किंवा तालमीच्या वेळीं किंवा स्नानभोजनाच्या प्रसंगीं नाटक संस्थेमध्यें स्त्रीपुरुषाला एकांत करण्याची संधीच नसते. रा. टेंबे यांचें, रा. महाबळ यांच्या स्त्री पुरुषांचे एकांतांत प्रसंग आले असतां त्यांची मनोवृत्ति चलबिचल होण्याचा संभव असतो, या आक्षेपाला हें उत्तर आहे; परंतु स्त्रीपुरुषांचीं मनें एकमेकावर जाण्याला एकांतच लागतो ही समजूत चुकीची आहे. एकांत सांपडल्यानें जशी मनाची चलबिचल होते, तशी स्त्रीच्या किंवा पुरुषाच्या अंगच्या विशेष प्रकारच्या आकर्षक गुणांनीही होते. म्हणूनच love at first sight अशी ह्मण पडली आहे. कालीदासानें स्त्री स्वभावाचें हें चित्र शकुंतलेच्या

वरील वाक्यांत बरोबर दाखविलें आहे. मृच्छकटीक, मालती माधव, विक्रमोर्वशीय, शापसंभ्रम, या नाटकांतील नायिका, प्रथमदर्शनीं नायकावर अनुरक्त झाल्याचें नाटकारांनीं दाखविलें आहे. कामदेवाच्या उत्सवासारखे, जनसंमर्द असलेल्या प्रसंगांतच तरुण स्त्रीपुरुषाचे अंतरंग, एकमेकाविषयीं विकास पावलेले नाटकांतून दृष्टीस पडतात. रोमियो व जुलिएट नाटकांत मेजवानीच्या समारंभांत रोमियो व जुलिएट एकमेकांच्या प्रीतिपाशांत पडलेले शेक्सपियरनें दाखविले आहेत. कालिदास व शेक्सपियर हे मानवी स्वभावाचें अविष्करण करणारे खरे नाटककार समजले जातात. त्यांनीं हजारों प्रेक्षकासमोर एकमेकांविषयीं प्रीतिबद्ध झालेले स्त्रीपुरुष दाखविलेले आहेत. तेव्हां रा. टेंबे यांच्या हजारों प्रेक्षकांचा, तालमीचा व स्नानभोजनाच्या एकांतासंबंधांचा युक्तिवाद पोकळ वाटतो. व " **ज्या समाजांत हे निर्बंध** ( एकांताचें ) **घातले आहेत तो मानवी नसून पाशवी आहे.** " असें गृहीत धरण्यापर्यंत रा. टेंबे यांची मजल गेली आहे हें पाहून त्यांच्याच मनोवृत्तीची काय कल्पना करावी हें समजत नाहीं.

स्त्रियांच्या मनोभावना कोमल असतात. रंगभूमीवर परपुरुष संसर्गानें मन व शरीर यांची द्विधा वृत्ति होण्याचा संभव असतो, हा रा. महाबळ यांचा स्त्रियांनीं रंगभूमीवर येण्यासंबंधानें जो आक्षेप आहे त्याला टेंबे यानीं पूर्वीचे दाखले देतांना, स्त्रियांनीं नाटक प्रयोगांत भूमिका घेतल्याचें ऊर्वशीचें एक उदाहरण पुढें केलें आहे. आपल्या मुद्याच्या समर्थनार्थ सुचेल तो मुद्दा पुढें करण्याची

वहिवाट आहे. परंतु याच ऊर्वशीकडून स्त्री स्वभावाला अनुसरून जो प्रमाद घडला, तोच बायकांनीं रंगभूमीवर येण्याच्या मुद्याला आडवा येत आहे. ऊर्वशीची अगोदरच पुरूरव्यावर प्रीति बसली होती. रंगभूमीवर लक्ष्मीच्या भूमिकेंत " माझें मन पुरुषोत्तमावर आहे," असें म्हणावयाचें तें न ह्मणतां माझें मन पुरूरव्यावर आहे." असें ती बोलून गेली. या तिच्या प्रमादाबद्दल ऋषीनें तिला शाप दिला. हा कथाभाग देण्याचा उद्देश—यांत कवीनें स्त्रीस्वभावाच्या चंचलतेचें उदाहरण ऊर्वशीच्या मनोधर्माच्या रूपानें दाखविलें आहे, तो स्पष्ट होतो. हीच ऊर्वशीनें घेतलेली लक्ष्मीची भूमिका पुरुष नटाकडे असती तर त्याच्याकडून " माझें मन पुरूरव्यावर गेलें आहे " असें कधीं म्हटलें गेलें नसतें.

स्त्रियांनीं रंगभूमीवर येण्यासंबंधानें आणखी एक किरकोळ आधार देण्यांत येतो—अर्जुनानें विराटराजाची कन्या उत्तरा इला नृत्यगायन शिकविलें होतें हा. शिकविलें असेल ! लग्नापूर्वी लहान मुली नाना प्रकारचे खेळ खेळतात; परंतु पुढें संसारांत पडल्यावर त्यांची त्यांना आठवणसुद्धां नसते. उत्तरेचा अभिमन्यूशीं विवाह झाल्यावर, तिनें तोच अभ्यास पुढें चालविल्याचें किंवा अर्जुनास द्रौपदी, सुभद्रा आदिकरून पट्टराण्या असतांना त्यानें आपली विद्या त्यांना शिकविल्याचा पुराणांत आधार असल्याचें कोणी अद्याप दाखविलें नाहीं. स्त्रियांनीं रंगभूमीवर येण्याचे दाखले दाखविण्यांत येतात, तसें पुरुषांनींही स्त्रीभूमिका केल्याचे दाखले आहेत. श्रीविष्णूनें मोहिनीचें रूप घेतलें होतें. श्रीकृष्णाचा पुत्र

सांब यानें स्त्रीपार्ट केला होता; वादाकरितां पुराणांतील हे दाखले दिले आहेत. मालती माधव नाटकांत मकरंदानें स्त्री वेष घेतला होता. परंतु हीं उदाहरणें इतकीं शुष्क आहेत कीं, त्यांच्यावर आपल्या मताच्या सिद्ध्यर्थ इमारत बांधणें व्यर्थ आहे असें सत्य-स्थितिवरून ह्मणावें लागतें. रा. टेंबे यांच्या मताला पुष्टि देणारे जे कोणी पुरुष व स्त्री वर्गांतले असतील ते अशांपैकीं आहेत कीं, नुसते लेखणीपांडित्य करून वेळ मारून नेत आहेत. प्रत्यक्ष कृतीनें आपलें मत लोकांच्या प्रत्ययाला कोणी आणून देणारे दिसत नाहींत.* ह्मणून रा. टेंबे यांच्या या विषयाच्या समर्थनाचा ठसा लोकांच्या मनावर उठत नाहीं. रा. महाबळ यांचाच निषेधपर लेख अधिक मननीय व विचारणीय वाटतो.

महाराष्ट्रांत नाट्यकला निर्माण होऊन आज जवळ जवळ ८०।९० वर्षे झालीं. तिच्यांत क्रमाक्रमानें सुधारणाही होत गेली. स्त्रियांचा रंगभूमीवर प्रवेश साठ वर्षांपूर्वीच झाला आहे. यांत कांहीं वेश्याही आल्या व कुलीनही येऊन गेल्या. अद्यापिही ज्या कांहीं रंगभूमीवर धंदा ह्मणून करणाऱ्या स्त्रिया आहेत, त्यापेक्षां कुलीन स्त्रियाच रंगभूमीवर येऊन नाट्यकलेची उन्नति करतील असें ह्मणण्यास विशेष आधार काय? नाट्यकलेची अवनति झाली आहे, तिचें कारण कुलीन स्त्रिया नाटकांत नाहींत ह्मणून नसून, दुसरीं पुष्कळ कारणें आहेत, हें मागें सांगितलें आहे.

* हें विधान आम्हीं हल्लींच्या "नाट्य मन्वंतर" मंडळींत कांहीं संसारी स्त्रिया आहेत हें ऐकून व प्रत्यक्ष पाहत असून करीत आहोंत हें येथें सांगितलें पाहिजे. नाटक मंडळींच्या अशाश्वतीचा खंदक ओलांडून ही मंडळी पैलतिरास अद्याप पोंचावयाची आहे.

## कुलीन स्त्रियांच्या अडचणी.

कुलीन स्त्रियांनीं भूमिका करण्यांत आणखी किती अडचणी आहेत या बद्दल नाटकांतील कांहीं प्रसंगाचा उल्लेख करूं. समजा, थोरले माधवराव पेशवे यांच्या मृत्यूचें नाटक रंगभूमीवर चाललें आहे. हें नाटक कै० कीर्तने यांनीं साठ सत्तर वर्षांपूर्वीं लिहिलें आहे. हें मराठी भाषेंतील उत्तम नाटकांपैकीं समजलें जात होतें व याचे प्रयोग मराठी रंगभूमीवर अनेक वेळां होऊन गेले आहेत. या नाटकांत रमाबाई सती जात आहे हा प्रसंग आहे, ही भूमिका कुलीन स्त्रीनें करण्यासारखी आहे काय ? नवरा प्रत्यक्ष जीवंत असतांना एखादी कुलस्त्री उसन्यानवऱ्याकरितां सती जाईल ही कल्पनाच करवत नाहीं. मराठी भाषेंत अशींही नाटकें आहेत कीं ज्यांत विधवा स्त्रीच्या भूमिका आहेत. कर्णवध नाटकांत कुंतीचें पात्र आहे. कोणती कुलस्त्री आपलें कुंकू पुसून ही भूमिका करील ? हीं ऐतिहासिक उदाहरणें मुद्दाम दिलीं आहेत. काल्पनिक नाटकांतील उदाहरणें येथें घेत नाहीं. कारण कल्पनेनें पाहिजे तें पात्र रंगवितां येतें असा आक्षेप घेणारे ह्मणतील. उदाहरणार्थ "आंधळ्याच्या शाळेतील" सुशीलेचा नवरा किंवा "उसना नवरा" नाटकांतील अरविंद हीं पात्रें नवरे नसून कुलीन स्त्रियांच्या हातांतील केरसुणीच्या किंमतीचीं नाटककारांनीं घातलेलीं आहेत. यांत नवऱ्याची काय प्रतिष्ठा राहिली ? बर्नार्डशा किंवा इपसन सारखे विचित्र देशांतील नाटककार व देशकाल वर्तमानाच्या पांघरुणाखालीं त्यांचें अनुकरण करणारे आमचे नाटककार तयार असल्यावर लोकांना झुलविण्या-

करितां त्यांच्यापासून दुसरें काय मिळणार आहे? कुलीन स्त्रियांकडून असलीं नाटकें करविण्यासंबंधानें संस्कृतीच्या व सदभिरुचीच्या दृष्टीनें प्रत्यवाय आहे, ही गोष्ट समाजानें दृष्टीआड करावी अशी नव विचाराच्या वर्गाची इच्छा आहे. पूर्वी कॉलेजमध्यें संस्कृत नाटकें होत असत, तेव्हां वेणसिंहार नाटकांत धर्माची भूमिका करणारे विष्णूशास्त्री चिपळूणकर यांनीं प्रत्यक्ष तीर्थरूपासमोर तर्पण केलें होतें, परंतु आतां जिवंतपितृक तरुण मंडळी हौसेनें मुंडन करीत आहेत; या आधारावर आपल्या बायकांनीं दुसऱ्याला नवरा समजावें ही कल्पना आपल्या समाजांत तरी रुजू असू नये. पुरुष आणि स्त्रिया यांच्या मनोरचनेंत भेद आहे, त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. स्त्री धर्माच्या मर्यादा स्त्रियांनीं पाळल्या पाहिजेत अशी शिष्ट सांप्रदाय पाळणाराची इच्छा असते. अलीकडचे तरुण मिशावर्जन करितात, म्हणून तरुणींनीं आपलें सौभाग्य जो कुंकुमतिलक त्याचें आजिबात विसर्जन करावें असें प्रत्यक्ष त्यासुद्धां ह्मणणार नाहींत. सुशीक्षिताच्या हातीं नाट्यकला दिली तर तिला उर्जित अवस्था येईल असें रा. टेंबे व त्यांच्या मताचे जे कोणी आहेत त्यांचें ह्मणणें आहे. सुशिक्षितांच्या हातीं नाट्यकला दिली तर वरील नाचरेपणाचे प्रकारच पहावयास मिळणार ना? सुशिक्षितांच्याही नाटकमंडळ्या झाल्या व अशिक्षितांच्याही झाल्या; परंतु त्यांतल्यात्यांत अशीक्षितांच्या बऱ्याच दिवस टिकून राहिल्या व त्यांनीं कलेचें कांहीं तरी कार्य केलें आहे.

सुशिक्षितांच्या नाटकमंडळ्यांना नाट्यकलेला उर्जित दशेला आणण्याला अवकाशच मिळाला नाहीं.

पुरुष नटाकडून चालविलेल्या स्त्री पात्राच्या भूमिका विकृत स्वरुपाच्या दिसतात असें आह्मास तर वाटत नाहीं. विकृत स्वरुप होईपर्यंत पुरुषांनीं स्त्रियांच्या भूमिका घेतल्याच पाहिजेत असा कांहीं निर्बंध नाहीं. विकृत स्वरुप होईपर्यंत पुरुषांकडून स्त्रियांच्या भूमिका करवू नयेत ह्मणजे झालें. स्त्रियांचें तरी सौंदर्य गंधर्व लोकच्या अप्सरेप्रमाणें अमर आहे असें थोडेंच आहे. त्यांचें गर्भारपण, मुलांचें लेंढार, उतार वय इत्यादि नैसर्गिक अडचणी त्यांना रंगभूमीवर विकृत स्वरूपांत दाखविण्यास सज्ज असतात. पुरुषांकडून मात्र विकृत स्वरूपांत रंगभूमि पाहण्यास अयोग्य, परंतु स्त्रियांकडून रंगभूमि नटवून एकंदर समाज विकृत करण्यास हरकत नाहीं असें का समजावयाचें ?

रंगभूमीवर नायिकेला भिन्नभिन्न प्रकारचे मनोविकार अंगीक व उद्गाररूपानें दाखवावयाचे असतात. यांत कांहीं शृंगारविषयक, विरहोत्पादक, शोकजन्य असतात, हे मनोधर्म अभ्यासाशिवाय, चिंतनाशिवाय साध्य होणारे नसतात. हा व्यासंग प्रत्यक्ष पतीचें सानिध्य असतां परपुरुषाच्या ठिकाणीं कुलस्त्रियांनीं पतीची कल्पना करावयाची, हा

## कलेचा विकास नसून विचका आहे.

असें ह्मटलें पाहिजे. आह्मी असें घेऊन चालतों, कीं, ज्या स्त्रिया या पेषांत सध्यां आहेत, किंवा पुढें पडतील त्या सुशील

आहेत, असतील. त्यांचे मनोधर्म खंबीर असतील तरी दुसऱ्या पुरुषाच्या ठिकाणीं पतीची कल्पना करणें, कलेच्या उद्धाराकरितां कां होईना हा कुलस्त्रीचा धर्म नव्हे ! जी कुलस्त्री आहे तिला आपण घटकेकरितां तरी पर पुरुषाला पति समजतों ही आपण आपल्या प्रत्यक्ष पतीशीं प्रतारणा करतों असें वाटल्याशिवाय राहणार नाहीं.

दुसरा एक कमीपणा कुलस्त्रिया रंगभूमीवर गेल्यापासून त्यांना येण्याचा संभव आहे, तो असा कीं, लग्नकार्यांत, हळदीकुंकवाचे समारंभ, स्त्रियांच्या सभा यांमध्यें अशा स्त्रियांना अगत्याचें व बरोबरीच्या नात्याचें बोलावणें किंवा त्यांशीं मोकळ्या अंतःकरणानें बोलणें चालणें होईल कां नाहीं ही शंका आहे. आणि असें झालें असतां त्यांना एकप्रकारें आपल्याला बाहेर टाकल्याप्रमाणेंच वाटणार आहे; अशा रीतीनें कुलीन स्त्रियांचा सामाजिक दर्जा कमी करण्याला हौशी पुरुष कारण होणार आहेत; व हें सर्व कशाकरितां तर रंगभूमीची उन्नति करण्याकरितां ! ! !

" स्त्रियांनीं परपुरुषाला वल्लभाच्या ठिकाणीं कल्पून त्यांच्याशीं उत्तान शृंगाराचा अभिनय करणें यांत श्री महाबळ याना अनीति दिसते " हा आक्षेप रा. टेंबे यांना पटत नसून याचें उत्तर टेंबे देतात कीं, " कोंवळ्या युवकांना वल्लभेच्या ठिकाणीं कल्पून त्यांच्याशीं उत्तान शृंगाराचा अभिनय करण्यांत अनीति नाहीं काय ? " अभिनय हा एक नाट्याचा कृत्रिम भाव आहे. स्त्रियांशीं प्रत्यक्ष शृंगाराचे अभिनय करणें आणि कोवळ्या युवकाशीं ह्मणजे

पुरुषी नटीशीं करणें यांत रा. टेंबे यांना कांहींच भेद दिसत नाहीं काय ? आणखी टेंबे म्हणतात कीं, " प्रथमपासून स्त्रियांना जर रंगभूमीवर मज्जाव झाला नसता, तर आजकालचे उत्तान शृंगाराचे प्रकार पहावयास मिळाले नसते. " टेंबे यांच्या या विधानाला त्यांचेंच विधान कसें आडवें येतें तें पहा:—" स्त्रियांनीं स्त्री भूमिका करण्याचा सांप्रदाय फार प्राचीन काळापासून रूढ आहे. " हें जर खरें तर कालिदास, भवभूति, शूद्रक यांसारख्या सर्वमान्य कवींनीं स्त्रीस्वभावाची अमर्यादा करणारे उत्तान शृंगार नाटकांत घातले कसे ? यावरून स्त्रियांच्या भूमिका करण्याला स्त्रियांना त्या काळीं रूढीची अनुज्ञा नसली पाहिजे; व पुरुषच स्त्रियांची भूमिका करीत असले पाहिजेत हें अनुमान निघतें.

स्त्रियांनीं रंगभूमीवर प्रवेश करणें हें पाश्चात्यांचें अनुकरण नसेल तर आर्यांची सुधारणा करणाऱ्या ज्या ज्या अधुनिक कल्पना, फयाशना व नव्या नव्या लोकरीति प्रचारांत येत आहेत, त्यांतीलच स्वकपोलकल्पित " स्त्रिया आणि रंगभूमि " ही एक कल्पना काढणारांना सुचली आहे असें घेऊन चालूं. परंतु अशा वेळीं कोठल्या तरी सुधारलेल्या देशांत स्त्रियांना रंगाविण्याची सुधारणा असेल तेथील परिणाम आहे काय आहेत व तेथील इतिहास काय सांगतो तो पाहूं.

## पाश्चात्य रंगभूमीवरील स्त्रिया.

इंग्लंडच्या रंगभूमीवर ह्यूजेस नांवाची एक नटी होती. ती प्रिन्स रूपर्ट नांवाच्या एका राजपुत्राची रखेली होती; ॲन ब्रेस

गर्डल् नांवाच्या एका नटीचा कॉनग्रीव्ह नाटककाराशीं संबंध होता, ब्यारी नांवाची नटी कोणी अर्ल ऑफ राचेस्टरचें अंगवस्त्र होती. अशीं पाश्चात्य नाट्यकलेंतील स्त्रियांचीं अनेक उदाहरणें देतां येतील. पाश्चात्यांनीं आपल्या नाट्यकलेचा इतिहास शोधपूर्वक लिहून ठेवला आहे. त्यामुळें ती कला इतकीं शतकें जिवंत राहिली आहे. आमच्याकडे महाराष्ट्रांत नाट्यकला पुन्हां अस्तित्वांत येऊन शंभर वर्षें झालीं नाहींत तोंच खरोखरीच्या व लौकिक अर्थानें "तिचीं शंभर वर्षें भरलीं" असें वाटावयास लागलें आहे. पाश्चात्यांच्या नाट्यकलेंतील जें ग्राह्य असेल तें न घेतां इकडील समाजाच्या अभिरुचीला न रुचणारे प्रकार व विचार मात्र प्रचारांत आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

संस्कृत नाटकाचे प्रयोग होत असत तेव्हां स्त्रिया रंगभूमीवर येत असत अशी कांहीं इंग्लिश ग्रंथकारांची कल्पना आहे ती खोटी आहे असें जगाच्या नाट्यकलेचा इतिहास लिहिणारे—**कोलाचलम् श्रीनिवासराव** बल्लारीचे एक वकील लिहितात. ( १९०८ ) ते म्हणतात: —

It is a mistaken idea entertained by some English authors that on the Indian stage women appeared when classical dramas ( Sanskrit ) were played. I for one could not find any authority in the sanskrit literature ...................... आणखी पुढें ते ह्मणतात: I earnestly hope for the sake of dramatic literature that

Indian females will not appear on the stage till India and Indian female education reach the height to which England has at present risen, and also till Indian manners and customs become as refind as the English.

रा. टेंब्याना इंग्रजी पुस्तकांतील मुजूमदार यानीं दिलेलीं अवतरणें आवडत नाहींत ( रत्नाकर १९३१ सालचा आगस्ट सप्टेंबरचा अंक ) व नाटकांत पळून आलेलीं मुलें पुढें प्रसिद्ध नट झाले आहेत हें मुजूमदाराचें ज्ञानप्रकाश पत्रांतील विधान त्यांना खपलें नाहीं. त्यानीं खोडसाळपणानें मुद्दाम विपर्यास करून मुजूमदाराची थोडी हेटाळणीही केली आहे. परंतु मुजूमदारांचा लेख व त्यांचें विधान हें टेंब्याना उद्देशून नव्हतेंच. कारण टेंबे यांची उत्तम नट म्हणून प्रसिद्धि नाहीं. किर्लोस्कर मंडळीच्या अडचणीच्या प्रसंगीं त्यांना शेंदूर लावून " हिरो " केलें होतें. तेव्हां मुजूमदाराच्या लेखाचा व विधानाचा त्यानीं ज्या प्रकारानें उल्लेख केला तो अप्रासंगिक होता, एवढेंच विषयांतर करून सांगावें लागतें.

वरील इंग्रजी उताऱ्यांत स्त्रियांनीं रंगभूमीचा पेषा केव्हां पतकरावा, तर स्त्रियांचें शिक्षण, पाश्चात्य देशांत ज्या दरजाला हल्लीं पोंचलें आहे, तितक्या ' उंचीला ' पोंचेल, शिवाय हिंदी रीतरिवाज आणि समाज रचना ( Customs ) अगदीं पाश्चिमात्याच्या बरोबरीनें सुधारणेंत परिपूर्ण होईल, त्यावेळेला रंगभूमीचा पेषा त्यांनीं पत्करावा ह्मणून त्या लेखकानें सांगितलें आहे.

वरील इंग्रजी अवतरणांत स्त्रियांनीं रंगभूमीवर येण्याची जी कालमर्यादा घालून दिली आहे तिचें भविष्य पृष्ठ १० मध्यें सांगितलें आहेच. स्त्रीस्वातंत्र व व्यक्तीस्वातंत्र या तत्वांचा जों जों फैलाव होत जाईल तों तों कुलीन स्त्रियांचें पाऊल रंगभूमीच्या मार्गाकडे कदाचित् अधिक जवळ येईल असें आह्मांसही वाटतें.

महाराष्ट्र नाट्यकलेच्या पूर्वभागांत स्त्रियांनीं रंगभूमीचा पेषा केव्हां पतकरला हें सांगितलें आहेच; परंतु त्या स्त्रिया संसाराच्या व्यापांत पडलेल्या नव्हत्या, तर ज्यांच्याशीं त्यांचा सवदा पटला त्यांच्या आश्रयानें राहणाऱ्या होत्या. १८ व्या शतकांतल्या इंग्लंडच्या रंग भूमीवरचा इतिहास वर दिलाच आहे. नटींना प्रीतिपत्रें पाठविणें,त्यांना रंगभूमीवरून परस्पर पळवून नेणें, हे प्रकार नित्याच्या परिपाठांतले त्या इतिहासांत वाचण्यांत येतात. या प्रकारामुळें स्त्रिया अपखुषीनें किंवा इच्छेविरुद्ध उल्लू पुरुषाच्या पाशांत पडत असत. तिकडच्या रंगभूमीवरच्या स्त्रियांशीं उमराव सुद्धां लग्नें करीत असत असें सांगण्यांत येतें; परंतु याच स्त्रियांपैकीं कांहींना घटस्फोटाच्या कायद्या-खालीं असलेल्या उमरावापासून वेगळें व्हावें लागल्याचींही उदा-हरणें आहेत. अलीकडे मात्र नाट्यकलेच्या इतिहासांत बदल होत आला आहे. रंगभूमीवर पतिपत्नि दोघेही नाटकाच्या धंद्यावर उपजिविका करणारीं कांहीं कुटुंबें आहेत. त्यांत पत्नि एका नाटक मंडळींत तर पति दुसऱ्या नाटक मंडळींत असा व्यवहार चालतो. या नाटकांतून एकाची बायको रंगभूमीवर दुसऱ्याची बायको झालेली असते व तो प्रकार त्या समाजांत खपतो. आपल्या इक-

डेही " माया मच्छिंद्र " व " हरिश्चंद्र " चित्रपटांतील नायिका व " आंधळ्याची शाळा " या नाटकांतलें सुशीलेचें पात्र हीं अशींच पतिपत्नीच्या सलोख्यानें आलेलीं दृष्टीस पडतात. पाश्चात्य पद्धतीचें हें अनुकरण आहे. उघडपणें याचा प्रसार किती होतो हें यापुढें पाहणें आहे. " जगाच्या नाट्यकलेचा इतिहास लिहिणाऱ्या ग्रंथकारानें या संबंधानें ह्मटलें आहे कीं:—

पाश्चचात्य पद्धतीच्या वळणावर कुलीन स्त्रिया रंगभूमीवर आणण्याची कल्पना आणखी एक दोन शतकांत तरी आपल्या समाजांत शिरू नये, असें जरी वरील मत आहे, तरी अधुनिक मतवाल्या लोकांना इतकी घाई झाली आहे कीं ते, ज्यांच्यामुळें नाट्यकला अवनतीप्रत पोचली आहे किंवा पोचली जात आहे असें म्हणतात अशा नटवर्गाशीं सहवासाला स्त्रियांना आणून सोडण्याचा प्रयत्न करीत आहेत. ह्मणजे एक प्रकारें त्यांना विस्तवावर पाय ठेवण्यास भाग पाडीत आहेत असेंच ह्मटलें पाहिजे.

नवमतवादी नेहेमी—रुढीच्या विरुद्ध प्रतिपादन करून " समाज बदलत चालला आहे तेव्हां चालीरीतींत व अभिरुचींत फेरफार होणारच " असें प्रपादून सांगत असतात. परंतु या त्यांच्या विधानानें जो समाज आज परंपरागत चालरीति व धर्मसमजुती यांना धरून आहे, त्याचें समाधान होत नाहीं. तो ह्मणेल कीं; " चालीरीति बदलत असतील, जे धोतरें नेसत होते ते विजार पेनतील, जे मिशा ठेवीत होते ते मिशा काढतील, किंवा ज्या स्त्रिया कपाळभर ढळढळीत कुंकू लावीत होत्या त्या आतां

सूक्ष्मदर्शक यंत्रानें पाहतां येईल इतकें बारीक लावीत असतील. हे सर्व संसर्गानें बदलणारे प्रकार आहेत, परंतु निसर्गसिद्ध मनोधर्म आहेत त्यांत कधीं बदल होणार नाहींत. मातृप्रेम, मातृभक्ति, पितृभक्ति, पुत्रप्रेम, पत्निप्रेम, कन्या, पुत्र, भाऊ, यांविषयीं वत्सलता हे मनोधर्म मनुष्यमात्राच्या ठिकाणीं कायमचे आहेत. या सर्वांत पतिपत्नि प्रेमाचें पावित्र्य अधिक आहे. आपल्या मातेला दुसरा एखादा आई ह्मणून समजूं शकेल, बहिणीला बहीण म्हणूं शकेल, एकाद्या अनाथ मुलाचें पुत्रवत् पालन करूं शकेल; परंतु **आपल्या पत्नीला दुसऱ्यानें पत्नीप्रमाणें समजणें हा मनुष्य धर्म कधीं-कधीं होणार नाहीं.**

हा प्रश्न एकादी स्त्री रंगभूमीवर आली किंवा एखादा नट सुशिक्षित व निर्व्यसनी असून त्याच्या बरोबर काम करावयाचें आहे त्या संबंधाचा व्यक्तीपुरता नाहीं. असे निर्व्यसनी नट व शीलवती नटी असूं शकतील; परंतु ते अपवादादाखल समजले जातील; एकंदर कुलीन स्त्रियांच्या संबंधाचा विचार जेथें कर्तव्य आहे तेथें असें एकादें उदाहरण उपयोगी कसें पडणार ? नवमत वाद्यांची रुढीविरुद्ध जशी ओरड आहे तशी नीतिविरुद्धही आहे. त्यांना नीतिदृष्ट्या कुलीन स्त्रियांनीं रंगभूमीवर प्रवेश करूं नये असें ह्मटलेलें खपत नाहीं. यावर त्यांचा युक्तिवाद असा आहे कीं पुरुष वर्ग नीतीचें भय कोठें बाळगतो ? या त्यांच्या युक्तिवादाचा असा अर्थ घ्यावयाचा काय कीं पुरुष नीतिमान नसतात, तर स्त्री वर्गालाच निर्बंध कां ?

स्त्रिया आणि रंगभूमि या वादाचा निष्कर्ष काढावयाचा तो वरील विवेचनावरून काढतां येण्यासारखा आहे. साधक बाधक प्रमाणें देऊन या विषयाचा उहापोह प्रस्तुत पुस्तकांत केला आहे. रा. टेंब्यानीं या विषयावर बरेंच " वाक्पांडित्य " ( हा शब्द त्यांचा आहे ) केलें आहे. यावर रा. महाबळ यांचा निषेधपर लेख सप्रमाण व मुद्देसूद आहे. परंतु रा. टेंबे यानीं आपल्या पोकळ कोटिक्रमानें तो खोडण्याचा प्रयत्न केला आहे. या शिवाय संजीवनी मासिकाच्या खास अंकांत ( १९३१ ) रँ. परांजपे व कांहीं सुशिक्षित भगिनी वर्गाचे मुद्दाम मागविलेले लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्यांत कोणी या विषयाचा स्पष्ट निषेध केला आहे तर कोणी आपलें संदिग्ध मत व्यक्त केलें आहे. पुढें प्रत्येकाच्या मताचें थोडक्यांत दिग्दर्शन केलें आहे त्यावरून कळून येईल.

प्रथम रँग्लर परांजपे ह्मणतातः– ( हा अभिप्राय इंग्रजींत आहे) "पुरुषापेक्षां स्त्रिया रंगभूमीवर चांगलें काम करतील व ही एक सुधारणा होईल" पुढें आणखी ते ह्मणतात. "समाजानें व्यक्तीस्वातंत्र्याविरुद्ध मग तो पुरुष असो अगर स्त्री असो निर्बंध घालण्याच्या मी विरुद्ध आहे. " " स्त्रिया आपला स्वतःचा बरा वाईट विचार करण्याला समर्थ झाल्या ह्मणजे त्यांनीं नाटकाचा धंदा पतकरावा असें मी ह्मणेन. तथापि **नाटकाच्या धंद्याच्या पांघरुणाखालीं तरुणस्त्रिया नीतिभ्रष्ट न होतील याविषयीं सावधगिरी ठेवलेली मला आवडेल.** "

## श्रीमंत सौ. कमलाबाई किबे, इंदूर.

" स्त्रियांनीं रंगभूमीवर काम करण्यांत एक प्रकारची सभ्यता दिसू लागेल. फक्त विचारपूर्वक हा प्रश्न समाजानें सोडविला पाहिजे. उत्साह, भावना किंवा त्वरा यांत करून भागणार नाहीं. "

## मिस विमल लालजी, वाडीया कॉलेज पुणें.

" निवळ धंदा ह्मणून रंगभूमीवर जाणें जरी चांगलें नाहीं, तरी स्त्रियांनीं रंगभूमीवर जाऊं नये, असें ह्मणणें मूर्खपणाचें नाहीं कां ? पण एवढें खरें कीं, सध्यांच्या परिस्थितींत स्त्रियांनीं त्या बाजूकडे जाणें धोक्याचें आहे.

## सौ. सुशीला कोठीवान जी. ए. नागपूर.

यांनीं विस्तृत लेख लिहून शेवटीं आपल्या मताचा उपसंहार पुढील उद्गारांत केला आहे.

" कितीतरी अर्थोत्पादनाचीं समाजोपयोगी, आपल्या संस्कृतीला व नीतिला बाध न आणणारीं कामें हवीं तितकीं असतां या कामाचीं कार्यक्षेत्रें पूर्णत्वानें स्त्रियांनीं न व्यापतां, रंगभूमीसारखें कार्यक्षेत्र स्त्रियांनीं शोधून काढावें याचें फार मोठें आश्चर्य वाटतें!"

## कु. पिरोज आनंदकर बी. ए.

कुलीन स्त्रिया रंगभूमीवर गेल्यावर त्यांची नीति बिघडेल असें याना वाटत नाहीं. " हा व्यक्तिगत मताचा प्रश्न आहे " असें याना वाटतें.

### कु. बेबी कुळकर्णी खांडवा.

या बाईनें, " नाट्यमन्वंतरानें सौ. वर्तक, वासिष्ठ, जोत्स्ना भोळे यांना प्रेक्षकांपुढें धैर्यानें आणून उभें केलें, या बद्दल मन्वंतराला कितीही धन्यवाद दिले तरी थोडेच होणार " असें म्हणून हें एकच उदाहरण सध्यां तरी सुशिक्षित **परंतु सडलेल्या मेंदूना ताळ्यावर आणील** " असें या कु. बेबीचें म्हणणें आहे.

### सौ. कमलाबाई फाटक खांडवा.

" समवयस्क तरुण व कुलीन तरुणींनीं रंगभूमीवर येणें मला तरी कसेंसेंच वाटतें....कितीही मनोनिग्रह केला तरी विकार प्राबल्य होऊन पुरुष व स्त्री दोघेही विवेक भ्रष्ट होऊन विकारास बळी पडतात. " असें या म्हणतात.

### सौ. यमुनाबाई हिर्लेकर एम्. ए.

" एवढें मात्र खरें कीं, रंगभूमिवर अभिनयापुरतेंच कां होईना, पण परपुरषाशीं सलगीचें प्रसंग येण्याचा संभव आहे. यामुळें चित्ताची चलबिचलही होण्याचा संभव अधिक, अशा प्रसंगीं कोणत्या नटाबरोबर काम करावयाचें हें ठरविण्याचें स्वातंत्र्य स्त्रियांनीं स्वतः-कडे ठेवावें ह्मणजे झालें. " असा यांचा अभिप्राय आहे.

### सौ. यमुनाबाई द्रवीड बी. ए.

कलम १ " स्त्रियांनीं रंगभूमीवर कामें करावींत. " असें यांचें मत आहे.

कलम ४ " नाटकें लिहिणाऱ्या लोकांना स्त्री भूमिका लिहितांच येत नाहींत. खाडीलकर देखील या नियमाला अपवाद नाहींत."

कलम ६ " हल्लींच्या रंगभूमीच्या परिस्थितींत स्त्रियांनीं हा पेषा पतकरणें धोक्याचें आहे. परंतु या धोक्याला स्त्रियांनीं भितां कामा नये. "

## सौ. लीला, जयकर खार.

" नाट्यकलेची वृद्धि करणें हा जरी स्त्रियांच्या उन्नति मार्गांपैकीं एक असला तरी देशाच्या हलाखीच्या परिस्थितींत तें कांहीं स्त्रियांचें मुख्य कर्तव्य नाहीं. देशसेवा, अस्पृशोद्धार, या सारख्या समाज सेवेच्या अनेक मार्गांनीं त्यांना आपली आत्मोन्नति करून घेतां येईल. "

स्त्री लेखिकांच्या दोन्हीं मतांचें येथें दिग्दर्शन केलें आहे. तें वाचून एकंदर स्त्रियांना रंगभूमीवर येण्याला सद्यस्थितींत किती अनुकूलता व प्रतिकुलता आहे हें समजून येईल. यांपैकीं कांहीं स्त्रियांनीं जरी आपलें मत रंगभूमीसंबंधानें अनुकूल ह्मणून व्यक्त केलें आहे, तरी आमचें सौंदर्य, आमचें कंठमाधुर्य, आमचे लवचिक अवयव इत्यादि ईश्वरदत्त नाट्योपयोगी गुणांचा गौरव- जो रा. टेंबे यानीं आपल्या लेखांत केला आहे तो त्यांनीं स्वत: करून घेतला नाहीं ही मेहेरबानी ह्मणावयाची ! हा त्यांच्या विनयादि गुणाचा अप्रत्यक्ष गौरवच आहे असें आह्मी समजतों.

नीति अनीतिच्या प्रश्नासंबंधानें विचार करावयाचा ह्मटलें तर अद्याप कोणी नीति अनीति यांची काय परवा करावयाची आहे ? नाट्यकलेची उन्नति झाली ह्मणजे झालें, असें म्हणण्याचें धाडस केलें नाहीं. नीतीची चाड सर्वांना आहे असें दिसतें. आमचें ह्मणणें

असें आहे कीं, रंगभूमीवर कुलीन स्त्रिया आल्या ह्मणजे त्यांची नीति बिघडेलच असें नाहीं; परंतु परकी स्त्रीपुरुष एके ठिकाणीं पाहिलें कीं, निंदकांना फावतें असा नेहमींचा अनुभव आहे. आपल्या बायकोसंबंधानें केलेली निंदा कोणाला ऐकवेल ?

## यद्यपि शुद्धम् लोकविरुद्धम्.

कुलीन स्त्रियांकडे वांकड्या नजरेनें पाहण्याला कोणालाही जागा नसावी, अशी सर्वत्र समजूत असते. " यद्यपिशुद्धं लोकाविरुद्धम् " हें समाजानें घातलेलें नियंत्रण मोडलें तर School for Scandal -निंदकाची शाळा-जवळपास उघडली जाण्याचा संभव ठेवलेलाच असतो.

स्त्रिया व पुरुष एकत्र जमले असतां स्त्रियांकडून नीतीचा पाया घसरण्याला सुरुवात होते असें कोणाचेंही ह्मणणें नाहीं. परंतु पुरुष तितके आत्मसंयमी नसतात. पुष्कळशीं उदाहरणें पुरुषांकडूनच स्त्रियांना वाकड्या मार्गाला लावल्याचीं घडून येतात. तेव्हां रंगभूमीवर स्त्रियांना प्रवेश करण्याचा प्रसंग आणून देणें ह्मणजे जाणून बुजून त्यांना विस्तवावर पाय ठेवण्यास लावणें आहे. स्त्रियांचें सौंदर्यादि-गुण निसर्गताच पुरुषांचें आत्मसंयमन नष्ट करण्यास कारणीभूत होतात एवढें मात्र खरें आहे.

" अग्नीपाशीं नवनीताची चुंबकमाणि संनिध लोहाची " हें सौभद्र नाटकांतील पद्य सर्वांच्या पाठांतलें आहे. ह्याप्रमाणें स्त्री सान्निध्यानें पुरुषांची " गति " होण्याचा अधिक संभव असतो, स्त्रियांना रंगभूमीवर येऊं नये म्हणून जो आक्षेप आहे तो

वरील कारणाकरितां आहे. खरें पाहिलें असतां नाट्यसृष्टीचें वातावरण अद्याप जितकें शुद्ध व्हावयास पाहिजे आहे तितकें झालें नाहीं. अशा वातावरणांत कुलीन स्त्रियांचा समावेश करणें अकालीं होत आहे. नटवर्गाची मन:प्रवृत्ति, आपणास रंगभूमीबाहेर असलेल्या शिष्ट समाजानें बरोबरीच्या दरजानें वागवावें, आपल्या वर्तनाविषयीं त्याच्या मनांत तिटकारा—किळस उत्पन्न होऊं नये या गोष्टींकडे अद्याप वळलेली दिसत नाहीं. नटांची दिनचर्या व त्यांचे मानसिक व्यापार हीं अगदीं स्वतंत्र सृष्टींतलीं आहेत अशीं दिसतात. पाश्चात्य नटांच्या एका चरित्रकारानें नटांच्या स्वभावाचें वर्णन केलें आहे, तें वाचलें म्हणजे आपल्या इकडील नटवर्गाच्या दिनचर्येंत व त्यांत अंतर दिसत नाहीं. तो म्हणतो:—

## नटवर्गाचें स्वभाववर्णन.

The players live in a world and atmosphere peculiar to themselves, to read their lives is to become acquainted with a class of being not only different from mankind in their affinities and affections, but governed by motives and impulses which have no similarity to the ordinary spring of action in other men."

नटांचें समाजबंधन आणि वातावरण हीं त्यांच्याकरितां अगदीं स्वतंत्र आहेत, असें त्यांचें जीवनचरित्र पाहिलें म्हणजे म्हणावें लागतें. मनुष्य जातीची स्वाभाविक अभिरुचि व तिचें संसर्ग

यांपासून नट हा प्राणी अगदींच निराळा असतो, इतकेंच नाहीं तर त्याची मनोवृत्ति व त्याचे हेतु जे इतर मनुष्याच्या कृतीमध्यें प्रवाहरूपानें दिसतात त्यांशीं त्याचें साम्य मिळत नाहीं.

अठराव्या शतकांतल्या नटांचें हें वर्णन आहे, तें प्रस्तुतही महाराष्ट्रीय नटांना लागूं पडतें. नाट्य संमेलनाच्या अनेक अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत नटवर्गावर हेच आक्षेप घेतले आहेत कीं, त्यांचें बाह्य वर्तन, पोषाख, चालरीत हीं ते ज्या समाजांतले ह्मणून समजले जातात, त्याशीं मिळून दिसत नाहींत. त्यामुळें ते समाजांतून खड्याप्रमाणें निवडून काढल्याप्रमाणें दिसतात. अशा नटवर्गाशीं निकट संबंध ठेवून धंदा करणाऱ्या कुलीन स्त्रिया कमीच सांपडतील असें आह्मांस वाटतें.

“ कुलीन स्त्रिया आणि रंगभूमि ” या प्रश्नासंबंधानें साधक बाधक विवेचन रंगभूमि मासिकांत १९०८ सालीं येऊन गेलें आहे, त्याची पुनरावृत्ति आलीकडे होत आहे. तेव्हां पेक्षां आतां विशेष कांहीं लोकमतांत फरक झालेला दिसत नाहीं. या पंचवीस वर्षांत स्त्री शिक्षणाची प्रगति पुष्कळ झाली आहे व स्त्री वर्ग आपलीं मतें निर्भीडपणानें लोकांपुढें मांडण्यास समर्थ झाला आहे. तरी आपली परंपरा, लोकरुढी व संस्कृति सोडून रंगभूमीच्या मार्गाकडे धाव घेण्यास तयार झालेला स्त्री वर्ग धिटाईनें पुढें आला नाहीं हें त्यांचीं मागें दिलेलीं विधानें पाहून सहज ध्यानांत येणार आहे.

कांहीं काळ असा होता कीं पतित झालेल्या स्त्री वर्गाला उदर निर्वाहाला मोलमजूरी करणें किंवा पराधीनतेशिवाय मार्ग नव्हता. परंतु स्त्रीशिक्षणाचा राजमार्ग मोकळा झाल्यापासून स्वावलंबनाचे अनेक मार्ग त्यांना सुस्थिति प्राप्त करून देण्याला सज्ज आहेत. शिक्षकीणी, सुईणी ( मिडवाईफ ) शिवण वैं विणण्याचीं कलाकुसरीचीं कामें या नवीन धंद्यावर बराच स्त्रीवर्ग आपला उदरनिर्वाह करीत आहे व या कामाच्या शिक्षणाचे वर्ग उघडण्यांत आले आहेत. स्त्रियांची पराधीनता नाहींशी व्हावी म्हणून त्यांना रंगभूमीचा मार्ग दाखविण्यांत येत असतो. परंतु या रंग. भूमीच्या मार्गापेक्षा त्यांच्या करितां या वर्गाच्या ज्या सोयी झाल्या आहेत, त्या अधिक सन्मानाच्या आहेत. जग बदलत चाललें आहे या सबबी नेहमी ऐकण्यांत यतात. परंतु या सबबीबरोबर समाजबंधनें शिथिल होत चाललीं आहेत, हाही बोभाटा ऐकण्यांत येत आहे. प्रस्तुतच्या नाटकीय वर्गाचें वातावरण शुद्ध नसल्यानें स्त्रियांनीं त्यांत भाग घेऊ नये असें एकीकडे ह्मणावयाचें व दुसरीकडे कलाविकासाकरितां स्त्रियांना ( कुलीन ) त्यांत घुसडावयाचें हा विसंगतपणा नाहीं कां ? आह्मला तर पुरषांबरोबर स्त्रियांचेंही वातावरण मलिन करण्याचा हा प्रयत्न दिसतो.

ह्मणून आमच्या मतें:—

१ लोकमत अद्याप तयार झालें नाहीं.

२ स्त्रिया रंगभूमीवर गेल्यानें नाट्यकलेचा दरजा आहे, या पेक्षां वाढणार नाहीं.

३ स्त्रियांपेक्षां पुरुष नट नायिकेच्या भूमिका समजून करीत आले आहेत, करतात व करतील.

४ स्त्रीभूमिका करण्यास सुस्वरूप मुलें उपयोगी पडत आहेत, तों पर्यंतच त्यांच्याकडे त्या भूमिका द्याव्यात. पुढें हींच मुलें पुरुषाची भूमिका करण्यास आपोआप तयार होतात.

५ संगीताचा अतिरेक झाला तो कमी करावा, म्हणजे गद्य नाटकाला उपयोगी असे हल्लींच्या बेकारीच्या दिवसांत चांगले नट मिळतील व तयार होतील.

६ हल्लीं ज्या वर्गांतल्या स्त्रिया रंगभूमीवर कामें करतात त्यांनीं आपल्या पहिल्या पेषाचा राजीनामा द्यावा व शिष्टसंमत असें शील पतकरावें, म्हणजे त्यांनाच कुलीनत्व येऊन कलेची सुधारणा करण्याला त्या समर्थ होतील.*

---

* गणिका ( वेश्या ) असणाऱ्यांनीं हा धंदा करावा असें म्हणणाराही एक वर्ग आहे. त्याचा उद्देश हा कीं, त्यांचा नृत्य गायनाच्या कलेचा अभ्यास जन्मादारभ्य असतो. त्याच कलेच्या अंगभूत नाट्यकला असल्यामुळें त्यांनीं रंगभूमीचा पेषा पत्करल्यास नाट्यकलेंत एक सुधारणा होईल. (उन्नति नव्हे ) या उद्देशानें त्या वर्गाचें प्रतिपादन असतें. गेल्या ज्ञान-सत्रांत, वेश्या या कोणाच्या बापाच्या माल आहे काय? म्हणून एका विद्वान गृहस्थानें विचारलें होतें. त्यानें हें कदाचित् विनोदानें विचारलें असेल. या त्याच्या या प्रश्नाला विनोदानें उत्तर न देतां वस्तुस्थितीचें असें उत्तर आहे कीं, वेश्या या कोणाच्या बापाचाच काय? परंतु कोणाच्याही मुलाचा, काकाचाही माल होऊ शकेल. परंतु कुलीन स्त्रिया या लग्न होईपर्यंत आपल्या बापाचा माल असतात; व नंतर फक्त आपल्या नवऱ्याचा सत्तेचा माल असतात. त्यांची कोणत्याही दृष्टीनें अभिलाषा धरणें हें पाप तर आहेच; परंतु याला घरफोडीच्या धंद्याचाही एक प्रकार म्हणतां येईल.

विषयानुरोधानें :—

## नाट्यकलेचा ऱ्हास का झाला ?

या कारणांचा विचार करणें अप्रस्तुत होणार नाहीं. या प्रश्नाची व्यवहारिक कारणें हीं आहेत:—

१ याला कारण सिनमा सृष्टि नवी उत्पन्न झाली असें कांहींचें म्हणणें आहे; परंतु तें खरें नाहीं.

२ सिनेमा सृष्टीच्या बरोबरीनें नाट्यकलेची सुधारणा करण्याची महत्वाकांक्षा बाळगणारे नट व नाटककार यांची संख्या धंद्याच्या प्रमाणानें भरपूर असूनही त्यांच्यांत कल्पकतेचा व कर्तबगारीचा अभाव असल्या कारणानें खरी नाट्यकला मागें पडली आहे.

३ सिनेमा सृष्टींत नाट्यकलेला पोषक असे गूणच नाहींत. व नटांना आपली कर्तबगारी दाखविण्याला तिच्यांत अवसर मिळत नाहीं. अद्भुत देखाव्यांनीं नटांचें कौशल्य व अभिनय मारून टाकले आहेत.

४ चिरस्थायी नाटक मंडळ्या मोडल्या आहेत व मोडत आहेत. त्यामुळें महाराष्ट्र नाट्यकला अजिबात नष्ट होईल अशी भीति आहे.

५ नाटक मंडळ्यांत गुणाच्या मानानें पगार डोईजड होऊन त्या मेटाकुटीस आल्या आहेत. हें एक कारण त्या हलाखींत येऊन पडण्याला झालें आहे.

६ अनेक नाटक मंडळ्यांत फेऱ्या घालणारे नट अधिक होऊन एका मंडळींत टिकून राहणारे नट नाहींसे झाले आहेत. पूर्वींच्या नाटक मंडळ्या चिरस्थायी होत्या, याला कारण त्यांतले नट एका मंडळींत टिकून राहणारे होते. अस्थिर नटांवर धंदा करणाऱ्या नाटकमंडळ्यांचीही शाश्वति अस्थिर झाली व नटांच्या जीवनक्रमाला सुस्थितीचा मार्ग नाहींसा झाला.

७ सध्यांच्या नाट्यकलेची निकृष्ट स्थिति पाहून ती जगणार कां मरणार अशी जेथें स्थिति आहे तेथें स्त्रियांची उभारणी या कलेकडे करणें धोक्याचें आहे. महाराष्ट्र नाट्यकलेचा उदय होऊन ८०।९० वर्षें झालीं तरी जगाच्या प्रगतीबरोबर धावपळ करण्याचें सामर्थ्य कलेवर उपजिविका करणारांच्या ठिकाणीं आहे असें दिसून आलें नाहीं. खाणावळींत जेवणारा, खाणावळीचा मालक घालील तें अन्न खाऊन संतुष्ट राहतो, त्याप्रमाणें नाटककार लिहितील तीं नाटकें पढून धंदा करणाऱ्यांचा हा धंदा सिनेमाच्या नव्या व अपूर्व कलेपुढें मागें पडला यांत कसलें आश्चर्य? नाटकाच्या धंद्यावर खोऱ्यांनीं पैसा ओढणाऱ्या नाटक मंडळ्या आज सिनेमा मंडळ्याचे उंबरठे झिजवीत आहेत. स्वार्थी, अहंमन्य, धंद्याचें व कलेचें महत्व न जाणणाऱ्या नटांवर धंदा अवलंबून राहिल्याचा व अदूर दृष्टीनें धंदा चालविण्याचा हा परिणाम आहे. अशा स्थितींत कुलीन व घरंदाज स्त्रियांना रंगभूमीवर ढकलण्याचा जे अट्टाहास करीत आहेत ते एक प्रकारचें पाप करीत आहेत असेंच ह्मटलें पाहिजे.

नाटक मंडळ्यापेक्षां सिनेमा सृष्टीकडे स्त्री वर्गाच्या मनाची ओढ अधिक दिसते, हें हल्लीं स्त्रियांचा मोठा परिवार अनेक सिनेमांत प्रविष्ट झालेला दिसत आहे, यावरून ह्मणावें लागतें. परंतु कलेच्या दृष्टीनें सिनेमाला कांहीं निराळा दरजा प्राप्त झाला आहे असें दिसत नाहीं. सिनेमाच्या अपूर्वतेला अद्भुत देखाव्याचें सहाय्य व त्याबरोबर स्त्री सैन्याची त्यांत भरती झाली आहे. आर्थिक दृष्टीनें त्यांत जाणाऱ्या स्त्री वर्गाचा फायदा होत असेल; परंतु कलेच्या उन्नतीला तो सहाय्यभूत होईल असें मानण्याला जागा नाहीं. शिवाय हा वर्ग

कुलीन स्त्री वर्गापैकीं आहे किंवा नृत्यगायनाच्या कलेवर उपजीविका करणारा आहे, हा प्रश्न प्रस्तुत संशयित आहे. सरकशीसारखा द्रव्योत्पादनाचा, मोठया प्रमाणावर, अवढव्य खर्चाचा असा हा एक धंदा नवा झाला आहे खरा. वर वर विचार करणाराला नाट्यकलेचा ऱ्हास होण्याला सिनेमाचा प्रसार हें कारण वाटण्यासारखें आहे, परंतु मुख्य प्रश्न **कुलीन स्त्रियांनीं रंगभूमीचा पेषा पत्करावा कीं काय?** हा आहे.

आलीकडे उच्च ध्येयांनी प्रेरित होऊन कांहीं पदवीधरांनीं "नाट्य मन्वंतर" नांवाची एक मंडळी काढली आहे. व तिच्यांत नाट्य कलेच्या उन्नतीचें ध्येय मनांत धरून कांहीं स्त्रियाही आहेत; व अभिनंदनाची गोष्ट ही आहे कीं, मंडळीचे प्रयोग अभिनय दृष्टीनें निर्दोष होतात. मंडळी जीं नाटकें करते तीं समाजांतील चालीरीतीला पोषक आहेत किंवा क्रांतीकारक आहेत, या प्रश्नाचा विचार येथें कर्तव्य नाहीं. नाटक मंडळी ह्मटली कीं तिच्या अंतर्बाह्य गोष्टींत समाज डोळयांत तेल घालून टपलेला असतो. त्या गोष्टींत कांहीं अतिशयोक्तीच्याही वाफा निघतात. त्या योगानें लोकांचा मात्र गैरसमज असा होतो कीं, "बाहेरून जसें दिसतें तसें आंत नसतें" ह्मणून ज्या मुख्य गोष्टीला जपलें पाहिजे ती ही कीं. Cæsar's wife must be above suspecion.

कुलीन स्त्रियांनीं रंगभूमीचा पेषा पत्करू नये असें मत प्रस्तुत पुस्तकांत उघडपणें प्रतिपादिलें आहे व त्यांत कोणतेहीं अक्षम्य आरोप स्त्रियांवर घतले नाहींत. तथापि प्रस्तुत ज्या कुलीन स्त्रिया धाडसानें ह्मणा किंवा ईर्षेनें यांत पडल्या आहेत त्यांनीं आपल्या उच्च धेयाचें पावित्र्य अढळ आहे हें दाखवावें ह्मणजे झालें.

---

# कुलीन स्त्रिया आणि रंगभूमि.

## परिशिष्ट.

**ले.—आयुर्वेदाचार्य पांडुरंग हरि देशपांडे.**

आपण 'कुलीन' या शब्दानें गरती स्त्री असा अर्थ समजतों. अर्थात घराचे बाहेर कोणत्याही भानगडींत पडणें हें स्त्रियांच्या कुलिनत्वाला साजेसें नाहीं अशीच आजवरची समजुत आहे. भरताचे काळीं स्त्रिया म्हणे रंगभूमिवर कामें करीत ! पण त्यांचीच कुलीन स्त्रीची व्याख्या 'कुलीना ऽभ्यन्तरा ज्ञेया बाह्या वेश्याङ्गना स्मृता' अशी आहे. त्यांचे म्हणण्याप्रमाणें 'बाह्या' म्हणजे घराचे बाहेर ( अर्थात घराशीं संबंध नसलेल्या गोष्टींत ) लक्ष्य घालणाऱ्या स्त्रिया 'वेश्या' होत असें म्हणणें धाडसाचें—नव्हे चुकीचेंहि—होईल. तथापि त्यांच्या सारख्या नाट्याचार्यांनाही कुलीन स्त्रियांनीं घराबाहेर लक्ष घालणें आवडत नसे. मग ते त्यांना रंगभूमीवर कसे येऊं देतील ? जुन्या रूढीला नाहींशा करण्यासाठीं जुन्यांतले जुने आधार शोधतां शोधतां भरतापर्यंत जाऊनही निराशाच !

तथापि एकवेळ असें धरून चालूं कीं, नाट्यकलेच्या उन्नतीसाठीं कुलीन स्त्रियांनीं रंगभूमीवर पदार्पण करणें गर्ह्य नाहीं. स्त्रियांनीं आपलें पातिव्रत्य आपणच राखावयाचें आहे. जी कुल स्त्री ती रंगभूमीवरही कुलदोषरहित राहूं शकेल. उलट गृह कार्याच्या बुरख्याखालीं कुलीनत्वाचें ढोंग करणाऱ्याहि कांहीं कुलटा सांपडतील. पण या पूर्व पक्षांत सांगितलेली वस्तुस्थिति मान्य केली तरी ती सार्वत्रिक नाहीं, अपवादादाखल आहे. अर्थात त्यावरून नियम निघत

नाहीं. पण याचा विचार पुढें करूं. कलेचे उन्नतीसाठीं कुलीन स्त्रियांनीं रंगभूमीवर पदार्पण करावें, या युक्तिवादांत स्त्रियांचे मदतीविना रंगभूमि अवनत होत आहे व आजची रंगभूमीची हीन स्थिति स्त्रिया आल्यानें खास सुधारेल, असें गृहीत धरलें जातें. जे उन्नति होईल असें ह्मणतात त्यांना हल्लींची रंगभूमि हीन झाली हें कबूल आहे. हल्लींच्या रंगभूमीवर मात्र स्त्रियांनीं जाऊं नये, असें या विषयावर अनुकूल मत देणारांचें म्हणणें आहे. अर्थात रंगभूमीचें वातावरण आज तरी चांगलें नाहीं; मग जें चांगलें नाहीं त्यांत स्त्रिया गेल्या तर हमखास बिघडतील असें न ह्मणतां स्वतः चांगल्या राहून शिवाय रंगभूमि सुधारण्यासही कारणीभूत होतील इतकें सामर्थ्य त्यांच्यांत आहे, हें मानणें मनुष्य स्वभावाला सोडून नाहीं काय? बरें त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें हल्लींच्या नाटक कंपन्यांच्या नादीं न लागतां कुलीन व सुशिक्षित स्त्रीपुरुषांनीं नटलेल्या अशा नवीन धर्तीच्या कंपन्या काढल्या ही गोष्ट शक्य होऊन नाट्यांत मन्वन्तर होईल असें मानलें तर याही कंपन्याबद्दल खात्री देण्यास काय आधार? नवीन कंपन्यांतील सुशिक्षित कुलवान् स्त्रीपुरूष झाले ह्मणून नेहमीं स्वपतीबरोबरच स्त्रीला काम करण्यास मिळेल असें नाहीं, आणि मिळालें तरी घरीं कुलस्त्रीपुरूष कधींही न करतील असा उत्तान शृंगाराचा जाहीरपणें अभिनय करण्यानें या उभयतांचें कुलीनत्व कसें काय राहील हें समजत नाहीं! मग परपुरूषाला पतिस्थानीं, नाटकापुरतें का होईना, कल्पिणाऱ्या स्त्रीला आठवड्यांतून जाहीरपणें तीन वेळां, व तालमीच्या मिषानें

नेहमी, पतिपत्नी भावानें काम करावें लागणार असे स्त्रीपुरुष शरीरानें पवित्र आणि मनानें अव्यभिचारी राहतील असें मानणारास मानवी मनोविकारांचें सामान्य ज्ञान नाहीं असेंच ह्मटलें पाहिजे.

कलेच्या दृष्टीनें पाहूं गेलें तरी स्त्रियांनीं रंगभूमीवर जाण्याची अवश्यकता आहे, असें कोणीहि खरा नाट्यरसिक ह्मणणार नाहीं. नाट्य शब्दांतील मूळ धातु ह्मणजे नक्कल—अनुकरण-करणें. अर्थात नाट्य ह्मणजे जें अस्सल नसतें, व्यवहाराची ज्यांत नक्कल केली जाते त्याला नाट्य असें ह्मणतात:—

यानि शास्त्राणि ये धर्मा यानि शिल्पानी या क्रियाः ।
लोकधर्म प्रवृत्तानि तानि नाट्यं प्रकीर्तितम् ॥
(भ. ना. २६-११७)

कचिद्धर्मः कचित्क्रीडा कचिदर्थः कचिच्छमः ।
कचिद्धास्यं कचिद्युद्धं कचित्कामः कचिद्वधः ॥
नानाभावोपसंपन्नं नानावस्थान्तरात्मकं ।
लोकवृत्तानुकरणं नाट्यमेतन्मया कृतम् ॥
(भ. ना. १-११३)

असें भरतशास्त्र ह्मणतें. अर्थात नाट्य ह्मणजे नाना वस्थांचें अनुकरण, तेथें स्त्रियांच्या कामाची पुरुषांनीं नक्कल केली ह्मणून काय बिघडलें ? नक्कल करून अस्सलाची छटा उत्पन्न करावयाची यांतच तर नाट्यांतली खरी कला आहे. भरताचे वेळची नाट्यपद्धति वाचली ह्मणजे कृत्रिम साधनें शक्य तों टाळून अभिनय करण्याकडे प्रवृत्ति होती असें दिसून येईल. त्यानें सांगितलेले आंगिक, वाचिक, आहार्य आणि सात्विक हे अभिनयाचे मुख्य चार प्रकार व त्यांचे अनेक

शरीरावयवाचे द्वारें सांगितलेले अनंत प्रकार ह्मणजे उ. डोक्याचे आभिनयाचे १३ प्रकार, डोळ्याचे ३६; प्र. भ्रुकुट्यांचे ९, प्र. नाकाचे ६, अधर ६, ग्रीवा ( मान ) ९, हातांचे संयुतासंयुत (जोडलेले व सुटे मिळून ) व नाचण्याचे वेळचे असे एकंदर ६९, उराचे ९, पार्श्व ९, जठर ३, कटी ९, मांडी ९, पोटरी ९, व पाय ९ असे अभिनयाचे प्रकार, विशेषें एकच भुवई व नाकपुडी उडविण्याचे प्रकार, ( श्रवणे दर्शनेचैव भ्रुवमेकां समुत्क्षिपेत ) छातीसारखे निश्चल अवयवहि हलविण्याचे प्रकार इत्यादि अभिनय प्रत्यक्ष करून दाखवितां आले ह्मणजे ती अभिनयाची सीमा गाठली असें ह्मणावें लागेल. झोपाळा नसतां दोलाभिनय, पाऊस पडत नसतां तो पडत असल्याचा आभास उत्पन्न करणें इ. वर्णनें वाचून कृत्रिम साधनांचे मदतीशिवाय भावार्थ हुबेहूब करून दाखविण्यांत केवढें अभिनय कौशल्य लागत असेल याची कल्पना करवत नाहीं. ज्यांना अभिनय नैसर्गिक व्हावा असें मनापासून वाटतें त्यांना खराखरच भरतानुगामी उत्कृष्ठ अभिनयासाठीं स्त्रियांचीं कामें पुरुषांनीं करणेंच कलेच्या दृष्टीनें खास अधिक श्रेष्ठ वाटेल. स्त्रिया काय? त्या स्वजातीस्वभावाप्रमाणें हावभाव करणारच. त्यांत पाहण्यासारखें काय आहे? त्यांच्या हावभावाला खरोखर अभिनय ह्मणतांच येणार नाहीं. स्त्री नसताहि स्त्रीचा हावभाव तंतोतंत करून दाखविण्यांतच खरा अभिनय आहे. भरतानें अभिनयाची व्याख्या देतानांच मुळीं

‘ विभावयन्ति यस्माच्च नानार्थान्हि प्रयोगतः ।
शाखाङ्गोपाङ्गसंयुक्तस्तस्मादभिनयः स्मृतः ॥’

ह्मणजे प्रयोगानें नानार्थ (मूळचे नसलेले) प्रकट करून दाखविणें यालाच अभिनय ह्मटलें आहे. अर्थात अभिनयाची उत्कृष्ठता दाखविणें हेंच कलेचें खरें उन्नत स्वरूप जो मानतो त्याला स्त्रियांचीं कामें करण्यासाठीं स्त्रियांना रंगभूमीवर आणतांच येणार नाहीं. मग त्या कुलीन असोत कीं कुलटा असोत.

कलोपासमेचे रथी महारथी अडवणुकीसाठीं असेंही ह्मणतील कीं, मग स्त्रियांनीं पुरुषांचीं कामें केलीं तर चालतील कां? तर त्याला उत्तर असें कीं स्त्रीदेहासारखा नाजुक देह, मनोहर रुप व कोमल कंठ असलेले पुरुष जसे मिळतात तसे पुरुषाकृति पण सुरूपता कायम ठेवून पुरुषी दार्ढ्य चेहेऱ्यावर असणाऱ्या व विशेषें पुरुषाचाच आहे असें भासविणाऱ्या रुंदट आवाजाच्या स्त्रिया मिळणें कठीण; आवाजांत तरी त्यांचें स्त्रीत्व प्रतीत होणारच. अर्थात पुरुषांचाही अभिनय पुरुषांनाच करावा लागेल व स्त्रियांचें रंगभूमीवर कामच मुळीं उरत नाहीं. मग नीति अनीति हा प्रश्नच बाजूला राहतो.

तथापि अपवादात्मक का होईना सर्व दृष्टींनीं अभिनय उत्कृष्ठ करणाऱ्या स्त्रिया मिळाल्या आणि त्यांनीं केलेलें नाटकांतील काम पाहिल्यावर 'खरोखर इतकें चांगलें काम नटसम्राट ह्मणविणाऱ्याकडूनही होणार नाहीं' असे उद्गार निघाले तर मग केवळ कुलीनत्वाला बाध येतो या मानीव कल्पनेसाठीं स्त्रियांच्या रंगभूमीवरच्या पदक्षेपाला कां विरोध करावा? हा प्रश्न सरळ आहे; आणि या पक्षाच्या अभिमान्यांच्या युक्तिवादांत अधिक विचार करण्यासारखा एवढाच एक महत्वाचा भाग माझे दृष्टीनें आहे. रसिकाला कला-

विकास पाहण्यास मिळाला कीं त्या वेळेपुरता तरी तो बाह्य जगत् विसरून डोलूं लागतो व या दृष्टीनें एक रसिक ह्मणून कुलीन स्त्रीचें उत्कृष्ठ काम पाहतांना, कितीही मतभेद असतांना, तें आनंद देतें यांत शंकाही नाहीं. प्रश्न आहे तो अशाही स्थितींत केवळ कलैकदृग् होऊन एकाही कुलस्त्रीला रंगभूमीवर पदार्पण करूं द्यावें काय हा आहे; व ह्या तिचें अभिनयकौशल्य पाहून आनंद चाखण्यापूर्वीच करण्याचा आहे. उत्कृष्ठ रुचकर पदार्थ कोणत्याही ठिकाणीं पडलेला असला तरी त्याच्या रुचीचा आनंद चाखतां येईलच. प्रश्न आहे तो असल्या अमंगल स्थानचा रुचकरही पदार्थ खावा काय? व त्या दृष्टीनें कलैकदृग् होऊनही स्त्रियांच्या रंगभूमीवरच्या पदार्पणाविषयीं अनुकूल्य दर्शवितां येत नाहीं. कुलीनत्व व त्यांचे भोंवतीं असलेल्या नैतिक कल्पना या मानीव नाहींत. ज्यांना स्त्रीपुरुषांच्या अनैतिक संबंधाबद्दल कसलाही विधिनिषेध वाटत नाहीं त्यांचा विचारच निराळा आणि मग ते कलोपासनेची सबबही सांगत नाहींत. पण असें ज्यांना वाटत नाहीं त्यांनींच थोडा कलेचा चष्मा बाजूला सारून उघड्या डोळयांनीं रंगभूमीवरच्याच काय, इतरही स्त्रीपुरुषसंमिश्र समाजाकडे पहावें. कुलीनत्व आणि नीति केवळ मानीव कल्पना नाहींत. खंबीर मनाचे व कठोर तपश्चर्येचे महामुनि जेथें लटपटले तेथें सामान्य व्यवहारी माणसें रंगभूमीसारख्या शृंगारानुकूल वातावरणांत किती मनःसंयमन करतील? मनु ह्मणतो,:—

"स्वभाव एष नारीणां नराणामिह दूषणम् ।
अतोऽर्थान्न प्रमाद्यान्ति प्रमदासु विपश्चितः ॥"

(म. २-२१३)

अर्थात स्त्रीसंमिश्र स्वभाव म्हणजे अग्नीशीं खेळ आहे. कुलीनत्वाची कल्पना ' कुलीनाऽभ्यन्तरा ज्ञेया ' अशी असल्यानें कसल्याही पुरुषांच्या समाजांत स्त्रियांनीं जाणें व पर पुरुषादेखत मोठ्यानें बोलणें अकुलीन असें जे समजतात त्यांचे दृष्टीनें " कुलीन स्त्रिया आणि 'रंगभूमि' हा 'वदतो व्याघातच' आहे; पण स्त्रीचें पातिव्रत्य एवढेंच कुलीनत्व समजणारांहीः—

" संतुष्टो भार्यया भर्ता, भर्त्रा भार्या तथैवच ।
यस्मिनेव कुले नित्यं कल्याणं तत्र वैध्रुवम् ॥ ( म. स्मृ. ३-६० )

या मनुवचनाप्रमाणें, स्त्रीसाठीं पति व पतीसाठीं स्त्री अशा भावनेचे स्त्रीपुरुषच खरे कुलीन व त्यांचें घर तेंच कुल असें मानणार स्त्री रंगभूमीवर जाऊन परपुरुषांचें रंजन करूं लागली कीं ती या श्लोकांत म्हटल्याप्रमाणें स्वपतीचे मनापासून रंजन करूं शकणारच नाहीं. मग कुलदूषणाला काय उशीर? म्हणून पुनः मनुवचनाचाच आश्रय घ्यावयाचा तरः—

" सूक्ष्मेभ्योऽपि प्रसंगेभ्यः स्त्रियो रक्ष्या विशेषतः ।
द्वयोर्हि कुलयोः शोकमावहेयुररसंशयम् ॥" ( म. स्मृ. ९-५ )

कारण त्यांचें मतः—

" उत्पादनमपत्यस्य जातस्य परिपालनम् ।
प्रत्यहं लोकयात्रायाः प्रत्यक्षं स्त्रीनिबन्धनम् ॥" ( म. स्मृ. )

असें असल्यानें तदनुयायीयांना हें स्त्रीकार्य सोडून रंगभूमीसारख्या अकुलीनत्वाला सर्वस्वी पोषक असें कार्य कुलीन स्त्रियांनीं करावें, असें मुळींच वाटणार नाहीं. स्त्रीनें पुरुषाशीं व पुरुषानें स्त्रीशीं पूर्ण अव्यभिचारी रहावें असें जें उत्कृष्ठ ध्येयः—

'अन्योन्यस्याव्यभिचारो भवेदामरणान्तिकः ।
एष धर्मः समासेन ज्ञेयः स्त्रीपुंसयोः परः । (म. स्मृ. ९-१०१)

नव्हे-विवाहित पतिपत्नींचा धर्म व हें ज्या संस्कृतीचें वैशिष्ट्य तिला अन्य पुरुषाला नाटकासाठींही स्वपुरुषस्वरूपी मानणें कसें परवडेल? खोल मानसशास्त्राची साध्या व्यवहाराला गरजच नसते. स्त्रीपुरुष एका ठिकाणीं आले व विशेषें मोहक पोषाक, हावभाव यांनीं मीलित झाले कीं त्या ठिकाणीं कामविचार संभवणार हा सिद्धांत आहे.

"मात्रा स्वस्रा दुहित्रा वा न विविक्तासनो भवेत्।
बलवानिंद्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति ॥"

म्हणून मनूनें आई, बहिण, अगर स्वतःची मुलगी यांच्याशींही एकांतांत बसू नये असा दंडक घातला आहे. यांत किती अर्थ आहे हें प्रत्येकानें स्वतःचे खास मनाला प्रामाणिकपणें विचारावें. नाटकांत कामोत्पत्ति संभवत नाहीं, असें ज्यांना वाटतें त्यांना भरत वाक्यांतच, ती कशी संभवते हें सांगून:—

इह (नाटकें) काम समुत्पत्तिर्नानाबीज समुद्भवा ।
स्त्रीणां वा पुरुषाणां वा ।
श्रवणाद्दर्शनाद्रूपादङ्गलीला विचेष्टितैः ।
मधुरैः संप्रलापैश्च कामः समुपजायते ॥
रूपगुणादिसमेतं कलादिविज्ञानयौवनोपेतम् ।
दृष्ट्वा पुरुष विशेषं नारी मदनातुरा भवति ॥ (भ. ना.)

अशाही स्थितींत कुलीन स्त्रियांना रंगभूमीवर पाऊल टाकण्यास लावाल तर तें खास वाकडें पडून त्या कुलटा होतील असा धोक्याचा इषारा देऊन मी रजा घेतों.

# कुलीन स्त्रिया आणि रंगभूमि.

## परिशिष्ट २.

### लेः—प्रो. श्री. म. माटे. एम. ए.

**प्रो. माटे** यांनीं ज्ञानसत्रांत ता. २ डिसेंबर १९३३ रोजीं वरील
विषयावर भाषण केलें होतें तें हें:—

कुलीन स्त्रियांनीं रंगभूमीवर जाऊन नाटकांत कामें करावीं असें
झाल्यास किती स्त्रिया रंगभूमीवर जातील? सध्यां महाराष्ट्रांतील सर्व
कंपन्या मिळून अंदाजें दोन हजार माणसें नाटकाच्या धंद्यात गुंतलीं
आहेत. तीं सर्व संख्या स्त्रिया भरून काढतील हें शक्य नाहीं. बरें
प्रत्येक पुरुषागणिक एक स्त्री असेंहि प्रमाण पडणें शक्य नाहीं. तेव्हां
रंगभूमीवर जाणाऱ्या स्त्रियांचा हा आंकडा सूमारें दोनशेंच्या वर जाऊं
शकत नाहीं. लोकसंख्येचा इतका अल्प भाग या धंद्यांत जाईल असें
असतां या गोष्टीचा चांगलाच उहापोह होत असून, सर्व आबालवृद्ध
या बाबतींत मन घालून मोठ्या उत्सुकतेनें चर्चा करीत आहेत;
यावरून आपणांत जागृति असून यापुढें या जगांत जगण्यास
आपण खास पात्र आहोंत असें मला वाटूं लागलें आहे. हा प्रश्न
थोड्याशा लोकसंख्येचा असला, तरी त्यांत फार मोठें तत्व गोविलें
गेलें असल्यामुळें, आज सर्व समाजानें जी या बाबतींत एक प्रका-
रची कळकळ दाखविली आहे, ती पाहून संतोष वाटतो. दुसरी
आनंदाची गोष्ट अशी कीं, स्त्रियांसंबंधीं पुरुषांना व पुरुषासंबंधी
स्त्रियांना जी एकप्रकारची कळकळ असावी लागते, ती या वादामुळें
चांगलीच दृष्टोत्पत्तीस आली आहे. वास्तविकरीत्या हा प्रश्न केवळ
स्त्रियांचा असल्यामुळें त्यांनींच या बाबतींत पुढें येणें जरूर

होतें. पण तसें झालें नाहीं. आज आपल्या समाजापुढें याहीपेक्षां फार मोठे प्रश्न आहेत. त्या बाबतींत आह्मी बरींच आदळआपट केली आहे; पण तिकडे कोणाचें जावें तसें लक्ष गेलेलें दिसत नाहीं. वरील विधानांतील उपरोध सोडून दिला, तरी पण गंभीरपणानें सांगावयाचें ह्मणजे येवढेंच खरें कीं, पुरुष विचारमग्न आहेत. हा गुण अद्याप स्त्रियांच्या अंगीं आलेला नाहीं. तेव्हा तोंपर्यंत पुरुषांनींच हें काम केलें पाहिजे.

## स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनींच कराव्यात

हें बुद्धिदृष्टया स्वाभाविक व पटण्यासारखें आहे. परंतु त्याला एक पर्याय आहे. नाटक हें मुळांतच कृत्रिम असतें आणि तीच कृत्रिमता जास्त वाढवून स्त्रियांचीं कामें पुरुषांनीं करून तें यशस्वी करून दाखवितां येतें. पुरुषांनीं केलेला स्त्रीपार्ट येथें आलेल्यांपैकीं पुष्कळांनीं पाहिलाच असेल. गेल्या पंचवीस वर्षांत तर बालगंधर्वांनीं सर्वांना वेड लावलें आहे. गंधर्वांना स्त्री वेषांत पाहून खुद्द स्त्रियांनाच ते खरोखरीचे स्त्री आहेत कीं पुरुष आहेत हें ओळखण्यांत पंचाईत पडते. ( हंशा ) तेव्हा पुरुषांकडून योग्य स्त्री अभिनय होत नाहीं ही सबब लंगडी पडते. पण तोच अभिनय प्रत्यक्ष स्त्रियांनीं केल्यास जास्त चांगला वठेल या ह्मणण्यांतहि तथ्य आहे.

स्त्रियांनीं रंगभूमीवर यावें पण कुलीन स्त्रियांनीं मात्र येऊं नये असें माझें निश्चित मत आहे आणि तें मला या ठिकाणीं ठासून सांगावेंसें वाटतें. अभिनय करण्यांत निष्णात अशा ज्या स्त्रिया आहेत वज्या हस्तगत होण्यासारख्या आहेत त्यांना घेऊन त्यांच्या-

कडून अभिनय केल्यास तें ठीक होईल [ हंशा ] पण तें होत नाहीं. याचें कारण असें कीं तशा स्त्रिया मिळत नाहींत, असें नसून हलक्या दर्जाच्या बायकांबरोबर चांगल्या नटांना काम करण्याची लाज वाटते हेंच असलें पाहिजे; आणि तें खरें आहे. रंग सफेती लावून पडद्यावर त्या चमकू लागल्या म्हणजे असें वाटतें कीं, जणू इंद्रलोकच्या अप्सराच; परंतु त्यांचा तो रंग धुऊन काढल्यानंतर त्यांचे चेहरे ह्मणजे भिंताडेंच (हंशा) पण एवढ्यानें कुलीन स्त्रियांनीं स्टेजवर यावें हें ठरतच नाहीं. नाटकांत काम करण्यासाठीं कुलीन स्त्रिया हव्यात ही कधींही न संपणारी अशी मागणी आहे. कारण कुलीन स्त्री एकदां तेथें गेली कीं तिचें कुलिनत्व नाहींसें होऊन ती बिघडणारच; ह्मणजे पुनः कुलीन स्त्रिया हव्यात ही मागणी कायम राहते. (हंशा) तेथें अगदीं चांगल्या रीतीनें राहतां येतें ही नव्बळ थाप आहे. जसें काय तेथें जाणारे सगळे देवदूत आहेत. (हंशा) बोलायला संकोच वाटतो पण शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रांत थोडक्या बारकाईनें पहा, तेथें तुह्मांला काय आढळतें? मग हें तर काय बोलून चालून नाटकच. कांहीं तरी खूळ काढून कोणी जर साऱ्या

## समाजाचा चिवडा

करूं लागला, तर त्याचा हात धरण्यास तुह्मी त्वेषानें पुढें आलें पाहिजे. स्त्रियांनीं अर्थात कुलीन स्त्रियांनीं एकदां या धंद्यांत पाय घातल्यानंतर पुढें काय होईल आणि त्या कोठें जातील हें सांगतां येत नाहीं. चांगलें ठेवावयाचें असें यत्न करून चांगलें रहात नाहीं

मग जेथें उघड उघड धोका दिसत आहे तेथें अगोदर जाच कशाला? या बाबतींत अनुभवाचे बोल हेच सांगत आहेत. बालगंधर्व, बोडस, गोखले, मुजुमदार वगैरे मंडळींनीं या कामांत स्त्रिया नसाव्यात असेंच आपलें स्पष्ट मत दिलें आहे. यापुढेंही जाऊन श्री. बालगंधर्व ह्मणतात कीं, नाटक कंपनींत सोळा वर्षांखालील मुलेंही नसावींत. त्यांच्या या विधानांतील व्यंजना ध्यानीं आणा. ज्यांनीं आपलें सारें आयुष्य या धंद्यांत घातलें त्यांचे हे शब्द आहेत. आपण आपल्या समाजाविषयीं अत्यंत जागरूक असणें जरूर आहे. समाजांतील अडचणींत सांपडलेल्या स्त्रियांना लांबाविणारे कित्येक गुंड संधीची वाट पहात आहेत. आपण वेदांत सांगण्यांत गुंतलों असून बाहेरचे लोक आपल्या वेदांताचा फायदा घेण्यास टपले आहेत. आपण चांगले असलों ह्मणजे बाहेरचें जगही आपणांस चांगलें दिसतें, पण तसें नसतें.

तेव्हा स्वाभाविक कलेच्या नादीं लागून तुह्मी करायला जाल एक आणि होईल भलतेंच. पुढें या स्त्रियांची अत्यंत वाईट स्थिति होईल आणि मग कुलीन स्त्रियांनीं नाटकांत जावें असा पुरस्कार करणाऱ्या आजच्या समाजाच्या माथीं त्यांचे शाप येऊन बसतील.

सुशिक्षित लोकांनीं काढलेल्या व चालविलेल्या कंपनींत कुलीन स्त्रियांना जाण्यास हरकत नाहीं असें सागण्यांत येतें. पण अगोदरच सुशिक्षित कशाला ह्मणावयाचें? अगदीं पहिल्या इयत्तेपासून थेट एम्. ए. पर्यंतच्या शिक्षणाचे कार्यक्रम पहा व त्यांत मनोनिग्रह, आत्मसंयमन, ब्रह्मचर्य इत्यादि सद्गुण कोठें सांगितले आहेत ते दाखवा.

आपण आज इतके तरी चांगले राहिलों आहोंत याचें कारण शाळा कॉलेजें नसून आपलीं घरें चांगलीं होतीं हें होय.

## आमचे पूर्वज फार चांगले होते

ह्मणूनच आपण आज चांगले आहोंत. (टाळ्या) फार मोठ्या श्रीमंताला जुगारींत थोडे पैसे गेले तर वाईट वाटत नाहीं, तसें आपल्या समाजाला पूर्वजांच्या सुकृत्यामुळें फार पुण्याइ लाभली आहे, त्यांतून थोडीशी गेली तर आपणांस कळून येत नाहीं व त्यानीं कांहीं होत नाहीं अशी खोटीच समजूत होऊन मनुष्य आणखी तशाच गोष्टी करूं लागतो. तेव्हा आज दिसतें ही आपली पुण्याई नसून आपण

## पूर्वीच्या पुण्याईवर जगत आहोंत.

ही असली नवी संस्कृति बनविण्याचा फंदांत पडला तर आहे त्याची होळी करून बसाल. सुशिक्षणाचा बडेजाव मला सांगू नका. चांगले सुशिक्षित स्त्रीपुरुष देशकार्य करावयास एकत्र झाले; पण झालें काय- तर देशकार्य राहिलें बाजूलाच आणि लग्नें मात्र भराभर होऊं लागलीं. (हंशा) हा नरक आहे. तेव्हां तेथें स्त्रियांना ढकलू नका.

वेश्यांचें नांव काढतांच श्री. अत्रे हे खवळले. ह्मणजे त्यांनाही याचा राग येतो एकंदरींत. (हंशा) श्री. अत्रे हें 'वेश्या हा काय बापाचा माल आहे?' असें ह्मणून जें बोलले तें ऐकून मला आनंद झाला. त्यांच्या त्या रागाच्या उद्गाराची छाननी केली असतां त्यांना वेश्याविषयीं वाटणाऱ्या अनुकंपेमुळें ते असें बोलले हें दिसतें.

अगोदरच त्या दुर्दैवी स्त्रिया; त्यांच्यावर ही दुसरी आपत्ति कशाला ? असें त्यांचें ह्मणणें; मग ही आपत्ति कुलीन स्त्रियांवर तरी कां ?

**वेश्यांना जें वाईट तें कुलीन स्त्रियांना तर जास्तच वाईट.** तेव्हां कुलीन स्त्रिया रंगभूमीवर आणल्या तर चांगल्या आहेत त्याहीं वाईट बनतील.

वाईट वेश्यांना चांगल्या स्त्रियांसारखीं सोज्वळ कामें करतां येणार नाहींत, असा एक आक्षेप आहे. पण मग चांगल्या स्त्रियांना तरी वाईट कामें कशीं करतां येतील ( हंशा ) हा एक प्रश्नच आहे.

येथें जमलेल्या मुलांना मला अखेरचें एवढेंच सांगायाचें आहे कीं तुह्मी स्त्री हाच एक केंद्र समजून येथेंच गुंतून न पडतां त्यापेक्षांही अशीं

**दुसरीं मोठीं समाजोद्धारक कार्यें**

आहेत तिकडे आपली दृष्टि वळवा व त्यांच्या उद्धारार्थ आपली बुद्धि व श्रम खर्च करा."



रा. क्र. ४००५ दि. ८-१०-८८ रा. नो.

# रंगभूमीवरील कुलीन स्त्रिया.

## परिशिष्ठ ३ रें.

**लेः—रा. रघुनाथ दत्तात्रय गोडबोले, आर्टिस्ट, पुणें.**

अलीकडे कुलीन स्त्रियांनीं रंगभूमीवर प्रवेश करावा कीं नाहीं हा प्रश्न आपल्या महाराष्ट्रीय समाजांत एक मोठा विषय चर्चेचा होऊन बसला आहे. मोठमोठे नामांकित विद्वान, प्रोफेसर, वकील, डॉक्टर, राजकीय मुत्सद्दी आणि त्यांचेच बरोबर कांहीं घरंदाज, सुविद्य स्त्रिया या प्रश्नाची खाजगी अगर जाहीरपणें चर्चा अगर आपापलीं मतें व्यक्त करीत आहेत. यापैकीं बहुतेक सर्वच प्रत्यक्ष रंगभूमी आणि नाट्यसृष्टी यांचा यत्किंचितही निकट परिचय नसलेले असेच आहेत. अशा लोकांचा रंगभूमीशीं संबंध केवळ प्रेक्षक या नात्यानेंच येत असतो. क्वचित एकाद्या नटाशीं थोडाबहुत परिचय किंवा नाट्यप्रयोगाचे वेळीं सन्मान्य पाहुणे ह्मणून झालेली ओळख यापेक्षां रंगभूमी अगर नटांचा जीवनक्रम यांची माहिती या मंडळींना मुळींच नसते असें ह्मटलें तरी चालेल. तेव्हां रंगभूमीवर कुलीन स्त्रियांनीं जावें कीं नाहीं, याबद्दलच्या त्यांच्या मतास वस्तुतः कांहींच किंमत देतां येणार नाहीं. आपली सध्यांची रंगभूमी ही खरोखरीच गुलाबाच्या फुलाप्रमाणें आहे. रंगभूमीचें दृश्य जितकें नयनमनोहर व अल्हाददायक वाटतें, तितकीच त्याच्या भोंवतालची परिस्थिति अनीति, उत्तम श्रृंगार, आणि अनेक दुराचार यांच्या काट्यांनीं भरलेली असते. दुरून कलेसाठीं कला, कलोत्कर्ष वगैरे वाटेल तीं नांवें देऊन रंगभूमीचें स्वरूप अत्यंत उच्च कोटीला नेऊन

पोंचविण्याचे प्रयत्न करणें कांहीं वावगें नाहीं; परंतु तसें करतांना वर उल्लेखिलेल्या काट्याकुट्यांचा उपसर्ग आपणांस व आपल्या मुला-बाळांना लागू नये अशी खबरदारी घेणें अवश्य आहे. आतां आपल्या या विषयाचा आपण विचार करूं.

केवळ कलेच्याच उत्कर्षासाठीं कुलीन स्त्रियांचीच रंगभूमीवर अवश्यकता आहे काय? या प्रश्नाचा विचार करावयाचा असल्यास त्याचें अधिकृत उत्तर कलावंतच देऊं शकतील. इतरांना तें देण्याचा अधिकारच नाहीं. कारण विशिष्ट कलांतर्गत परिस्थिति व तेथील खाचाखोंचा त्या कलेच्या निकटवर्ति माणसासच अधिक माहीत असणार हें उघड आहे. महाराष्ट्रीय रंगभूमीला कुलीन स्त्रियांचे अभावीं खरोखरीच कलाहीनत्व येत असेल तर तें दूर करण्याची तळमळ त्या कलेच्या उपासकांस व व्यवसायिकांसच प्रथम लागावयास पाहिजे. आणि तशी ती लागली असती तर ही उणीव भरून काढ-ण्यासाठीं त्यांचे कडूनच जारीनें प्रयत्न झाले असते. परंतु वस्तुस्थिति तशी नसून बहुतेक सर्व नाट्य व्यवसायिकांस रंगभूमीवर कुलीन स्त्रियांनीं प्रवेश करणें अनिष्ट वाटतें.

आज हा प्रश्न प्रामुख्यानें पुढें येण्याचें कारण गेल्या चार दोन वर्षांत कांहीं 'कुलीन' स्त्रिया रंगभूमीवर कामें करूं लागल्या आहेत हें होय. वास्तविक महाराष्ट्र रंगभूमीवर गेल्या ३०-४० वर्षाच्या-पूर्वींपासूनच स्त्रियांचा प्रवेश झालेला आहे. विशेषतः सन १९०१-१९०२ सालाचे सुमारास "बेळगांवकर स्त्री-संगीत नाटक मंडळी" या नांवाची एक नाटक मंडळी स्थापन झाली आणि तिनें 'स्त्रियांची

कामें स्त्रियांनींच करावीं, या तत्वाच्याही पुढें मजल मारून पुरुषांच्याही भूमिका स्त्रियांनींच करण्याचा उपक्रम सुरू केला होता. यावरूनच प्रत्यक्ष नायकिणीचा व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांना रंगभूमीवर स्त्रीपुरुषांनीं एकत्र सहवास करावा हें अनिष्ट वाटत असलें पाहिजे. स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनींच केल्यास रसपरिपोष व सहजसुंदर अभिनय यांची भर पडून नाट्यकलेला उत्कर्ष प्राप्त होईल ही गोष्ट सर्वांशीं खरी नाहीं. रा. गोविंदराव टेंबे यानीं निसर्ग रमणीय हावभाव, मनोहर पदलालित्य. कर्ण मधुर कोमल आवाज व अशाच इतर स्त्रियांच्या अंगच्या गुणांचें काव्यमय वर्णन करून रंगभूमीवर स्त्रियांनीं प्रवेश करणें अगत्याचें आहे असें प्रतिपादन आपल्या लेखांतून केलें आहे. रा टेंबे हे स्वत: महाराष्ट्र रंगभूमीचे पूर्ण परिचित असे गृहस्थ असून वरील स्त्रीनाटक मंडळ्यांचा इतिहास त्यांस माहीत नसेल हें शक्य नाहीं. तर कांहीं विशिष्ट हेतूनें या तत्वाचा पुरस्कार करतांना ते जाणून बुजून या कंपन्याबद्दल अज्ञान दर्शवीत आहेत असेंच ह्मणावें लागतें.

आजपर्यंत ३०-४० स्त्रिया या व्यवसायांत पडल्या असूनही त्यांचे हातून कलोत्कर्ष होऊं शकला नाहीं, इतकेंच नव्हें तर पुरुषांनीं स्त्रीभूमिका करणाऱ्या इतर अनेक पुरुषी नाटक मंडळ्यांचा इतिहास, स्त्रियांपेक्षा पुरूषच स्त्री भूमिका अधिक सरस करू शकतात, ही गोष्ट पूर्णत्वानें सिद्ध करीत आहे. रा. टेंबे यानीं वर्णिलेले सर्व कोमल विकार स्त्रियांच्या अंगीं निसर्गत:च असतात, पण या त्यांच्या निसर्गरमणीयतेचा अभिनिवेश प्रत्यक्ष संसाररूपी नाटकांतच व्हाव-

याचा असतो, आणि संसाररुपी नाट्यप्रयोगांतील नायिकेचें काम करतानां वरील सर्व गुणांचा शक्य तों उपयोग स्त्रियांना करावयाचा असतो; आणि तो अभिनय कमी अधिक सरस वठण्यावरच प्रत्येकाचें संसारसुख अवलंबून असतें. ही गोष्ट रा. टेंबे यांजसारख्या प्रापंचिक सद्गृहस्थाना समजू नये हें मोठेंच आश्चर्य आहे.

रंगभूमीवर आतांपर्यंत झालेला स्त्रियांचा प्रवेश अयशस्वी ठरला आणि आतां तोच प्रयोग कुलीन स्त्रिया या नामाभिधानानें पुन्हा कांहीं मंडळीकडून पुरस्कारिला जात आहे. कुलीन स्त्रियांनीं रंगभूमीवर प्रवेश करावा कीं नाहीं या प्रश्नाचा विचार करतांना 'कुलीन' या शब्दाची व्याख्या काय करावी हाच प्रश्न पुढें उभा राहतो. कारण प्रत्येक मनुष्याला कुल हें असतेंच. महानंदा नाटकांत "नायकिणीच्या कुलाला बट्टा लाविलास" असा शब्दप्रयोग आहे. तेव्हां नायकिणीलाही 'कुल' असतें. अर्थात केवळ रूढार्थानें या शब्दाचा अर्थ घेऊन चालणार नाहीं. या शब्दाचा अर्थ अधिक स्पष्ट व्हावा ह्मणूनच कीं काय कांहीं जणांकडून नुसत्या कुलीन या शब्दाऐवजीं उच्च कुलीन या शब्दाचा उपयोग केला जात असतो; परंतु या दोन शब्दांनींही एखादा निश्चित अर्थबोध झाला असें होत नाहीं. माझ्या मतें आजचा प्रश्न शील आणि शालीनता यांच्याच दृष्टीनें ठरविणें योग्य होय. कारण कुलीन कुटुंबांतील व्यक्तीही शीलभ्रष्ट होऊ शकतात आणि अशा व्यक्तीचाच समाज अकुलीन अतएव त्याज्य ठरवीत असतो. तेव्हां आज जो प्रश्न आपणापुढें

आहे तो कुलीन स्त्रियांनीं रंगभूमीवर जावें कीं नाहीं हा नसून रंग-
भूमीवर कुलीन स्त्रियांचें शील कायम राहूं शकेल कीं नाहीं असाच
तो खरोखर आहे असें ह्मटलें तरी चालेल.

पूर्वींच्या कालांत समाजांतील पावित्र्याची भावना अत्यंत प्रखर
असल्यामुळेंच रंगभूमीवर पाऊल टाकणाऱ्या स्त्रिया आपापल्या कुलांना
पारख्या होऊन त्याज्य ठरविल्या गेल्या. आजच्या पावित्र्याच्या
कल्पना बऱ्याच शिथिल झाल्यामुळें नीति आणि शील यांचा पूर्वींचा
अर्थही पुष्कळांच्या मतें बदललेला आहे. इतकेंच नव्हें तर इंद्रियजन्य
उपभोग हा स्त्रीपुरुषांचा जन्मसिद्ध हक्क असून या हक्कास कसलेंही
बंधन असूं नये असें प्रतिपादन करणाराही एक पक्ष आज काल
समाजांत राजरोसपणानें वावरत आहे. अर्थातच येथपर्यंत मजल
गेलेल्या कोणाही मनुष्याच्या दृष्टीनें रंगभूमीवर कुलीन स्त्रियांनीं प्रवेश
करण्यांत कोणचाही धोका दिसणार नाहीं. परंतु स्त्रीपुरुषांच्या
पावित्र्याची कल्पना इतक्या शिथिल स्वरूपांत समाजाकडून मान्य
केली जाणें कोणत्याही कालांत शक्य होणार नाहीं. स्त्रियांचें पाति-
व्रत्य व त्यांचें शील अभंग राहण्यावरच मानवी जीवनाचें वैशिष्टय
अवलंबून राहणार, तों पर्यंत तरी वरील अनिर्बंध दृष्टि समाज कधींच
स्वीकारणार नाहीं; आणि ह्मणून रंगभूमीवर कुलीन स्त्रिया हा प्रश्नही
चालू पावित्र्याच्या कल्पनेच्याच आधारानें सोडविणें भाग आहे.
सारांश वर ह्मटल्याप्रमाणें कुलीन-अकुलीन हा प्रश्न विचारांत न घेतां
रंगभूमीवर गेलेल्या अथवा जाणाऱ्या स्त्रियांचें पावित्र्य अभंग राहूं
शकेल काय याचाच विचार करणें अवश्य आहे. इतिहासाचा दाखला

पाहूं गेल्यास तें तसें राहूं शकत नाहीं असाच अनुभव पूर्वींपासून येत आहे. कारण यापूर्वी आडनांवाच्या कुलीन स्त्रिया रंगभूमीवर गेल्या आणि शवटीं शीलभ्रष्ट होऊन वेश्या व्यवसायांत पडल्याचे अनेक दाखले दाखवून देतां येतील. विचार, विकार, व संयम या तिन्ही भावना एकाहून एक सरस अशा असल्या तरी प्रत्यक्ष आचारांत त्या उतरविणें अत्यंत कठीण आहे. स्त्री आणि पुरुष यांचे निकटवर्ती सान्निध्यांत संयम व विचार लुप्त होऊन शेवटीं विकाराचेंच प्राबल्य होत असतें हा सृष्टीचा नियम एक महान् योगी अथवा महामूर्ख यांच्या शिवाय इतरांस चुकवितां पूर्वीं आलेला नाहीं आणि पुढें येईल असें ह्मणणें वेडेपणाचेंच ठरेल आजच्या शाळा व कॉलेजांतील थिल्लर शिक्षणानें सुशीक्षित बनलेल्या स्त्रियांचे अंगीं कांहीं अचाट संयमशक्ति उत्पन्न होत असेल असेंही ह्मणतां येणार नाहीं. उलट दिवसें दिवस चित्ताकर्षक नटवेपणा, छिचोर फॅशन्स, आणि परदेशस्थांचें उच्छूंखल व्यक्तिस्वातंत्र्याचे विचार यांची सध्यां स्त्रीवर्गांत होणारी झपाट्याची वाढ त्यांच्या मनावरील संयम आणि विचारशक्तीचा ताबा उडून जात असून तेथें विकाराचें प्राबल्य अधिकाधिक होत आहे हें कोणाही विचारवंतास पटल्यावाचून राहणार नाहीं.

कोणी असें ह्मणतात "सध्यांचें रंगभूमीचें वातावरण वाईट आहे ही गोष्ट कबूल, परंतु सुशिक्षित स्त्रियांचा रंगभूमीवर प्रवेश झाला कीं तेथील पुरुष वर्गाची स्त्री दाक्षिण्याची भावना जागृत होऊन पुरुष वर्गाच्या वर्तनास आपोआपच आळा बसेल आणि अशा रीतीन सध्यांचा नाट्यसृष्टींतील अश्लीलपणा सहजच नष्ट होईल." अशा

माणसांस असा सरळ सवाल आहे कीं सद्गृहस्थ हो, नुसत्या दृष्टी-
भ्रमानें भांबावून जाऊन कलेसाठीं कला, निसर्ग रमणीयता, अशा
काव्यमय शब्द प्रयोगाची खैरात करून भलत्याच कल्पना दुस-
त्यांच्या ( स्वत: च्या नव्हे ) मुलीबाळींच्या मनांत भरविण्यापूर्वी
ज्या भावनापूर्ण अभिनिवेष नकली सौंदर्याची रंगभूमीवरील पडछाया
तुमच्या मनावर पडून हे काव्यमय कल्पनांचे तुषार तुह्मांस अल्हाद-
कारक वाटू लागले, त्याच नयन मनोहर देखाव्याच्या पाठीमागें
कसले घाणेरडे अश्लील चाळे चालले असतात हे पाहण्याची संधि
तुह्माला कधीं मिळाली आहे काय? ज्याला ती मिळाली असेल
असा कोणीही समंजस मनुष्य आपल्या मुलीबाळींचें अभिजात
सौंदर्य, शालीनता व पावित्र्य पणास लावून कलाविकासाच्या खुळ-
चट कल्पनांनीं आपलें मन भडकूं देणार नाहीं.

सध्यांच्या नाटक मंडळ्यांशीं स्त्रियांचा केवळ प्रेक्षक या नात्यानें
आलेला संबंधही कितीतरी उदाहरणांनी धोक्याचा ठरल्याचे दाखले
दाखवून देतां येतील. केवळ नाटक पाहतांना प्रत्यक्ष नटांशीं ओळखी
पाळखीचा संबंध येत नसूनही अनेक नामांकित नटांचीं चरित्रें कसो-
शीनें तपासून पहाण्याचा प्रयत्न अशा मंडळींनीं जरूर करून पहावा;
ह्मणजे ठिकठिकाणच्या कितीतरी स्त्रिया रंगभूमीवरील नटांच्या नाट्य
कौशल्यास मोहून जाऊन त्यांच्या नादीं लागून जगांतून उठल्याचे
दाखले त्यांस सांपडतील. अशा प्रकारें नटांच्या जाळ्यांत सांपडून
पतित झालेल्या बहुतेक सर्व स्त्रिया चांगल्या उच्च, कुलीन, घरंदाज,
व सुशिक्षित अशाच असल्याचें मला माहीत आहे. नुसता प्रेक्षक

या नात्यानें स्त्रियांचा नट वर्गाशीं आलेला संबंधही जर इतका पापमय असूं शकतो, तर त्याच नटवर्गाशीं रंगभूमीवर प्रत्यक्ष पति-पत्नींच्या भूमिका घेण्या इतका निकट संबंध सदोदीत रोजच्यारोज होणाऱ्या तालमींत आणि प्रत्यक्ष प्रयोगाचे वेळीं आल्यानंतरही स्त्रीचें मन निर्विकार राहील, व तोंडांतून उच्चारिल्या जाणाऱ्या रसोद्गारांचा तिच्या मनावर कसलाही परिणाम होऊं शकणार नाहीं. अशी कल्पना करून घेणें शूद्ध वेडेपणा नव्हे काय?

या पैकीं पहिल्या वर्गासंबंधीं विचार केल्यास एक गोष्ट प्रामुख्यानें नजरेस येते ती ही कीं, केवळ मनरंजन आणि दृष्टिसुख यांचा लाभ आपल्या समाजांतील सुंदर सुंदर तरुणींच्या अभिजात कौशल्यामुळें घेतां यावा यापेक्षां कोणताही उच्च हेतु या प्रतिपादनाच्या मुळाशीं असेल असें ह्मणवत नाहीं. दुसरा वर्ग हा तर केवळ समाजांतील उच्छृंखल विचाराच्या व कोमल, भावनायुक्त अशा सुंदर तरुणींना कलेच्या बुरख्याखालीं अनीतीच्या अंधःकारमय गलिच्छ वातावरणांत नेऊन सोडण्यासाठीं टपूनच बसलेला असतो. तिसऱ्या वर्गाचा हेतु तर केवळ स्वार्थ आणि द्रव्यसंपादन यापेक्षां कोणत्याही उच्च कोटीचा असूं शकत नाहीं. कलाव्यवसायासाठीं स्वतः जवळ असलेलें कौशल्याचें भांडवल अपुरें पडत असल्यामुळें विवेक भ्रष्ट व नादिष्ट अशा स्त्रियांना नाटकांत कामें करावयास लावून द्रव्य संपादन करावयाचें एवढा एकच हेतु याचे ठिकाणीं असतो.

वरील तऱ्हेचे विचार सुचण्याचें कारण रंगभूमीकडे स्त्रियांना बोट दाखविणाऱ्या महंतांच्या वर्णनांतील विसंगतपणा हेंच होय. उदाहर-

णार्थ स्त्री दाक्षिण्याचें आणि कलोत्कर्षाच्या मायावी मतांचें प्रदर्शन करणारे पहिल्या वर्गांतील बहाद्दर स्वतःच्या मुलीबाळी नाटकास घेऊन जातांना प्रेक्षकांतील एखाद्या पुरुषाचा चुकूनही स्पर्श त्यांस होऊं नये अशी काळजी किती दक्षतेनें घेत असतात याचें प्रत्यंतर थिएटरमध्यें कोणासही किती तरी वेळां पहावयास मिळेल. तीच गोष्ट दुसऱ्या वर्गाची ह्मणजे आचारभ्रष्ट कलावंताची होय. खरोखर ज्या कलावंतांना कुलीन स्त्रियांच्या अभावीं रंगभूमीवरील कलेची हानि होत आहे असें वाटत असेल त्यांनीं आपल्या कुटुंबांतील मुलीबाळींचा या कामीं उपयोग केल्यास तो कलासाधन व वर्धन या दोन्ही दृष्टींनीं उचित नाहीं काय? कारण कलावंत पुरुषाच्या नित्य सान्निध्यानें कला स्फूर्तीचे संस्कार बाहेरील स्त्रियांपेक्षां त्यांच्यावरच होणें अधिक सुलभ आहे. अशींच कांहीं उदाहरणें युरोपियन व अगदींच थोड्या बंगाली लोकांत दृष्टीस पडतात कीं, ज्या ठिकाणीं पति पत्नि दोघेही रंगभूमीवर कलाव्यवसाय करीत असतात. अर्थांतच त्यांच्या कुलशीलाचा इतिहास आपणास अवगत नसल्यामुळें या बाबतींत आदर्श ह्मणून त्यांचें उदाहरण ठेवतां येणार नाहीं. आपल्या महाराष्ट्रांत मात्र एकाही कलावंतानें आपल्या स्वतःच्या कुटुंबांतील मुलीबाळींना रंगभूमीवर आणूं दिलेलें नाहीं ही गोष्ट स्पष्ट आहे. एवढ्यावरून दुसऱ्यांच्या स्त्रिया रंगभूमीकडे आकर्षिल्या जाण्यासाठींच त्यांच्यावर गोड आवाज, सुकुमार बांधा, मोहक पदलालित्य, वगैरे शब्दांचें मोहिनीजाल पसरवून त्यांस आपल्या कंपूत ओढावें एवढाच तर त्यांचा हेतु नसेल ना? आणि तिसऱ्या वर्गाचा हेतु तर केवळ

स्त्रियांच्या अंगच्या जन्मजात आकर्षक गुणांच्या भांडवलावर व्यापार करून पैसा मिळविणें असल्या केवळ स्वार्थी बुद्धीनेंच प्रेरित झालेला असतो. रंगभूमीवर येणाऱ्या स्त्रीचें पावित्र्य अभंग राहिलें काय किंवा न राहिलें काय यांना दोन्हीही सारखेच; मात्र हें स्त्रीरुपी भांडवल कमी पडूं नये एवढ्यासाठीं रंगभूमीचें पावित्र्य, कलावैभव, पूर्ण निर्दोष असल्याचीच भावना नवीन नवीन स्त्रियांचे मनावर ठसाविण्याचा प्रयत्न करतील यांत आश्चर्य नाहीं. शेवटीं सर्व समाजाला विशेषत: सुशिक्षित भागिनी वर्गास एवढीच कळकळीची विनंति आहे कीं कलाविकासाच्या दिखाऊ दिमाखाला भुलून जाऊन आणि स्वार्थी व मतलबी पुरुष वर्गाच्या काव्यमय कल्पनांनीं हुरळून जाऊन स्वत:चें पावित्र्य पणास लावूं नका. कारण हेतुपुरस्सर नाट्य सृष्टीच्या अंतरंगाचा अभ्यास सूक्ष्मपणें करण्याच्या महत्वाकांक्षेनें मिळविलेलें माझे नाटकी जगाचे प्रत्यक्ष अनुभव आपणापुढें वरील लेखांत ठेविले आहेत; तेव्हां रंगभूमीच्या मार्गाकडे आकर्षिल्या जाणाऱ्या भोळ्या तरूण स्त्रियांना माझा हा लेख ह्मणजे धोक्याची सूचना आहे असें ह्मटलें तरी चालेल.

REFBK-0005007
निबंध
७६।६।८०
ग्रंथ संग्रहालय
५००५
दा. क्र.